महाराष्ट्र शासन

विभागीय आयुक्त कार्यालय, (महसूल शाखा) पुणे विभाग, पुणे.
विधानभवन, पुणे-४११००१.

वाचले :- १) पुणे विभागातील सन १९९७-९८ ते २०२१-२२ या कालावधीच्या पदोन्नत तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियमितीकरणाचा प्रस्ताव विभागीय पदोन्नती समितीच्या दि.२७/०३/२०२३ रोजी झालेली बैठक.
२) इकडील कार्यालयाकडील पत्र क्र.मह/आस्था-१(ई)/कावि/३५०/२०२३, दि.२८/०३/२०२३
३) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील पत्र क्र.नियम-२०२३/प्र.क्र.९४/ई-३,दि.०४/०७/२०२३.
४) इकडील कार्यालयाकडील पत्र क्र.मह/आस्था-१(ई)/कावि/९०७/२०२३, दि.२०/०७/२०२३.
५) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील पत्र क्र.नियम-२०२३/प्र.क्र.९४/ई-३,दि.२७/०७/२०२३.
६) इकडील कार्यालयाकडील पत्र क्र.मह/आस्था-१(ई)/कावि/१०३७/२०२३, दि.०१/०८/२०२३.
७) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील पत्र क्र.नियम-२०२३/प्र.क्र.९४/ई-३,दि.०२/०८/२०२३.
८) इकडील कार्यालयाकडील पत्र क्र.मह/आस्था-१(ई)/कावि/१०४५/२०२३, दि.०३/०८/२०२३.
९) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील शासन परिपत्र क्र.सेवाज्ये-१३१७/प्र.क्र.११६/ई-३, दि.२५/१०/२०१७.
१०) इकडील कार्यालयाकडील पत्र क्र.मह/आस्था-१(ई)/कावि/१२२०/२०२३, दि.०४/०९/२०२३.
११) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील पत्र क्र.नियमि-२०२३/प्र.क्र.९४/ई-३, दि.२९/१२/२०२३.
१२) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील शासन परिपत्रक क्र.सेवाज्ये-२०२३/प्र.क्र.२१४/ई-३, दि.२९/१२/२०२३.
१३) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील शासन परिपत्रक क्र.सेवाज्ये-२०२३/प्र.क्र.२१४/ई-३, दि.१३/१०/२०२५.
१४) इकडील कार्यालयाकडील ज्ञापन क्र.मह/आस्था-१(ई)/कावि/५५५/२०२६, दि.२०/०७/२०२६.

क्र.मह/आस्था-१(ई)/कावि/७५४/२०२६, दिनांक : ०७/०९/२०२६

विषय :- पुणे विभागातील पदोन्नत तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने अंतिम ज्येष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत.
दि.०१/०१/२०१६ ते दि.०१/०१/२०२१ या दिनांकावर आधारित.

ज्ञापन,

ज्याअर्थी, पदोन्नत तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांचे नियमितीकरणाची कार्यवाही करणेबाबत वेळोवेळी देणेत आलेल्या शासन निर्देशानुसार पुणे विभागातील सन १९९७-९८ ते २०२१-२२ या कालावधीच्या पदोन्नत तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियमितीकरणाचा प्रस्ताव विभागीय पदोन्नती समितीच्या दि.२७/०३/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत तयार करणेत येवून संदर्भिय क्र.२ अन्वये शासन, महसूल व वन विभाग (ई-३) यांना सादर करण्यात आला. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने सन १९९७-९८ ते २०२२-२३ या कालावधीच्या पदोन्नत तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियमितीकरणांस संदर्भिय क्र.११ च्या पत्रातील अटी व शर्तीस राहून मान्यता दिलेली आहे. त्यानुसार विविध मुद्यांचे अनुषंगाने व इतर बाबींकडे लक्ष वेधुन सूधारीत सेवा ज्येष्ठता यादी शासन स्तरावरुन प्रसिध्द करणे उचित होईल या स्वरुपाची धारणा व्यक्त करुन शासन स्तरावरुन उचित आदेश होणेबाबत संदर्भिय पत्र क्र.४ अन्वये विनंती केली होती. त्यानुसार संदर्भिय क्र.५ नुसार प्रकरणी ज्येष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच वाचले क्र.१२

नुसार तहसिलदार संवर्गाची दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीची प्राथमिक तसेच वाचले क्र.१३ नुसार अंतिम सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेत आलेली आहे.

वाचले क्र.११ मध्ये नमुद पत्रानुसार खाली नमुद अटी व शर्तीस अधीन राहून नियमितीकरणाची वर्षनिहाय सन २०१५-१६ ते सन २०२१-२२ (दि.०१/०१/२०१६ - दि.३१/१२/२०१६ ते दि.०१/०१/२०२१-दि.३१/१२/२०२१ याप्रमाणे) ज्येष्ठता सूची वाचले क्र.१४ अन्वये प्रसिध्द करणेत येवून त्यावर हरकती/सुचना मागविणेत आलेल्या होत्या. त्यानुसार सदर ज्येष्ठता सुचीवर प्राप्त हरकती/ सुचना यावरील तपशील आणि निराकरणासह सदर अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेत येत आहे.

(शीतल तेली-उगले, भा.प्र.से.)
विभागीय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- १) जिल्हाधिकारी पुणे / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर
२) संबंधित कार्यालय

२/- सदर ज्ञापन तसेच सोबतची सूची आपले अधिनस्त अधिकारी यांचे निर्दशनास आणुन देवुन त्याबाबतची पोहोच इकडील कार्यालयास सादर करावी.

२) राष्ट्रीय सूचना केंद्र, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.

२/- सदर ज्ञापन तसेच सोबतची सूची आपले अधिनस्त संकेतस्थळावर (website) प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल इकडील कार्यालयास उलटटपाली सादर करावा.

सही x x x
(डॉ.स्वाती देशमुख-पाटील)
सह आयुक्त, (महसूल)
पुणे विभाग, पुणे

नायब तहसिलदार संवर्गातून तहसिलदार संवर्गात पदोन्नतीचे अनुषंगाने सन २०१६-१७ ते सन २०२१-२२ (दि.०१/०१/२०१६ - दि.३१/१२/२०१६ ते दि.०१/०१/२०२१-दि.३१/१२/२०२१ याप्रमाणे) नियमितीकरणाचे अनुषंगाने वर्षनिहाय अंतिम ज्येष्ठता सूची

| अ.क्र. | श्री./श्रीमती | तहसिलदाराचे नाव | प्रत्यक्ष जात व जातीचा प्रवर्ग | जन्मतारीख | तहसिलदार संवर्गात प्रथम नियुक्तीचा दिनांक | नियुक्तीचा मार्ग | | | नियमितीकरणाचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | सरळसेवा-पदोन्नती | गुणवत्ता क्रमांक-मूळ ज्येष्ठता क्रमांक | परीक्षा वर्ष-निवडसूची वर्ष | | | |
| | | दि.०१-०१-२०१६ ते दि.३१-१२-२०१६ | | | | | | | | | |
| ४८८ | श्रीमती | अनिता शंकर देशमुख | अनुसूचित जाती | ०७-०४-१९७८ | ०५-०६-२०१३ | पदोन्नत | ४६ | २०१२ | ०१-०४-२०१६ | ३०-०४-२०३६ | |
| ४८९ | श्री. | संगमेश कोडे | खुला | १३-०३-१९८७ | ०२-०५-२०१६ | सरळसेवा | १ | २०१५ | ०२-०५-२०१६ | ३१-०३-२०४५ | अमरावती विभाग |
| ४९० | श्री. | रावडे स्वप्निल आप्पासाहेब | खुला | ११-०७-१९९० | ०२-०५-२०१६ | सरळसेवा | २ | २०१५ | ०२-०५-२०१६ | ३१-०७-२०४८ | नागपुर विभाग |
| ४९१ | श्रीमती | सुनिंता एम.नेर्लीकर | अनुसूचित जाती | १०-०६-१९७५ | ०५-०६-२०१३ | पदोन्नत | ४७ | २०१२ | ०१-०७-२०१६ | ३०-०६-२०३३ | |
| ४९२ | श्री. | विकास भालेराव | अनुसूचित जाती | १६-०१-१९७४ | १२-०८-२०१३ | पदोन्नत | २३ | २०१३ | ०१-०८-२०१६ | ३१-०१-२०३२ | |
| ४९३ | श्री. | रणजित भोसले | खुला | १४-०४-१९७८ | २०-०५-२०१३ | पदोन्नत | ८ | २०१२ | ०१-०९-२०१६ | ३०-०४-२०३६ | |
| ४९४ | श्री. | बालाजी व्ही.सोमवंशी | खुला | ०१-१२-१९७१ | १०-०५-२०१३ | पदोन्नत | ९ | २०१२ | ०१-०९-२०१६ | ३०-११-२०२९ | |
| | | दि.०१-०१-२०१७ ते दि.३१-१२-२०१७ | | | | | | | | | |
| ४९५ | श्री. | रूषिकेत कांतीलाल शेळके | खुला | २८-०७-१९७७ | १३-०५-२०१३ | पदोन्नत | १० | २०१२ | ०२-०४-२०१७ | ३१-०७-२०३५ | |
| ४९६ | श्री. | व्ही.एन.गाडेकर | अनुसूचित जमाती | ०५-०६-१९६१ | १६-०५-२०१३ | पदोन्नत | २९ | २०१२ | ०१-०६-२०१७ | ३०-०६-२०१९ | दि.३०-०६-२०१९ से.नि. |
| ४९७ | श्री. | व्ही.एस.विरनक | अनुसूचित जमाती | ०५-०७-१९६१ | १६-०५-२०१३ | पदोन्नत | ३० | २०१२ | ०१-०७-२०१७ | ३१-०७-२०१९ | दि.३१-०७-२०१९ से.नि. |
| ४९८ | श्रीमती | उज्वला सोरटे | भटक्या जमाती क | २२-०५-१९७९ | १३-०५-२०१३ | पदोन्नत | १३ | २०१२ | ०२-०७-२०१७ | ३१-०५-२०३७ | |
| ४९९ | श्रीमती | प्रियंका ढोले | भटक्या जमाती ड | २४-०७-१९८९ | ०१-०८-२०१७ | सरळसेवा | ८ | २०१५ | ०१-०८-२०१७ | ३१-०७-२०४७ | पुणे विभाग |
| ५०० | श्री. | अभिजीत जाधव | खुला | १२-०६-१९८७ | ०१-०८-२०१७ | सरळसेवा | २ | २०१६ | ०१-०८-२०१७ | ३०-०६-२०४५ | नाशिक विभाग |
| | | दि.०१-०१-२०१८ ते दि.३१-१२-२०१८ | | | | | | | | | |
| ५०१ | श्रीमती | रूपाली सांळूके (सरनोबत) | खुला | १९-०३-१९७६ | १०-०५-२०१३ | पदोन्नत | ८१ | २०१२ | ०६-०७-२०१८ | ३१-०३-२०३४ | |
| ५०२ | श्रीमती | रंजना उंबरहंडे (ढोकळे) | खुला | ११-०८-१९७८ | २५-०८-२०१४ | पदोन्नत | १४ | २०१४ | ०६-०७-२०१८ | ३१-०८-२०३६ | |
| ५०३ | श्रीमती | स्मिता प्रदीप पवार | खुला | २८-०७-१९७६ | २५-०८-२०१४ | पदोन्नत | १५ | २०१४ | ०६-०७-२०१८ | ३१-०७-२०३४ | |
| ५०४ | श्रीमती | लैला दावल शेख | खुला | २४-११-१९७७ | २८-०८-२०१४ | पदोन्नत | १६ | २०१४ | ०६-०७-२०१८ | ३०-११-२०३५ | |
| ५०५ | श्रीमती | सुनिता गंगाराम मुंढे (आसवले) | खुला | १०-०६-१९७८ | २५-०८-२०१४ | पदोन्नत | १७ | २०१४ | २९-०८-२०१८ | ३०-०६-२०३६ | |
| ५०६ | श्रीमती | सुरेखा छगन दिवटे | इतर मागास वर्ग | १५-०६-१९७६ | ०७-०९-२०१४ | पदोन्नत | १८ | २०१४ | ०१-०९-२०१८ | ३०-०६-२०३४ | |
| ५०७ | श्रीमती | गिता दिलीप दळवी | इतर मागास वर्ग | १५-०६-१९७४ | २२-०८-२०१४ | पदोन्नत | १९ | २०१४ | १८-११-२०१८ | ३०-०६-२०३२ | |

नायब तहसिलदार संवर्गातून तहसिलदार संवर्गात पदोन्नतीचे अनुषंगाने सन २०१६-१७ ते सन २०२१-२२ (दि.०१/०१/२०१६ - दि.३१/१२/२०१६ ते दि.०१/०१/२०२१-दि.३१/१२/२०२१ याप्रमाणे) नियमितीकरणाचे अनुषंगाने वर्षनिहाय अंतिम ज्येष्ठता सूची

| अ.क्र. | श्री./ श्रीमती | तहसिलदाराचे नाव | प्रत्यक्ष जात व जातीचा प्रवर्ग | जन्मतारीख | तहसिलदार संवर्गात प्रथम नियुक्तीचा दिनांक | नियुक्तीचा मार्ग | | | नियमितीकरणाचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | सरळसेवा-पदोन्नती | गुणवत्ता क्रमांक-मूळ ज्येष्ठता क्रमांक | परीक्षा वर्ष-निवडसूची वर्ष | | | |
| | | दि.०१-०१-२०१९ ते दि.३१-१२-२०१९ | | | | | | | | | |
| ५०८ | श्रीमती | शितल जयंत मुळे (भामरे) | इतर मागास वर्ग | ०१-०६-१९७६ | २६-०८-२०१४ | पदोन्नत | २० | २०१४ | ११-०९-२०१९ | ३१-०५-२०३४ | |
| ५०९ | श्रीमती | शुभदा ऊर्फ रोहिणी नितीन शिंदे | इतर मागास वर्ग | २०-०८-१९७७ | २५-०८-२०१४ | पदोन्नत | २१ | २०१४ | ११-०९-२०१९ | ३१-०८-२०३५ | |
| ५१० | श्रीमती | राधिका बारटक्के | इतर मागास वर्ग | २४-०८-१९७८ | २५-०८-२०१४ | पदोन्नत | २२ | २०१४ | ११-०९-२०१९ | ३१-०८-२०३६ | |
| ५११ | श्रीमती | बाई सर्जेराव माने | इतर मागास वर्ग | ०५-०५-१९७७ | २६-०८-२०१४ | पदोन्नत | २३ | २०१४ | ११-०९-२०१९ | ३१-०५-२०३५ | |
| ५१२ | श्रीमती | सुषमा पांडूरंग पैकेकरी | भटक्या जमाती क | १६-०८-१९७५ | ३०-०८-२०१८ | पदोन्नत | | २०१८ | ११-०९-२०१९ | ३१-०८-२०३३ | |
| ५१३ | श्रीमती | अर्चना पाटील | खुला | ०८-०३-१९७७ | २५-१०-२०१८ | पदोन्नत | ३ | २०१८ | ११-०९-२०१९ | ३१-०३-२०३५ | |
| ५१४ | श्री. | दिनेश पारगे | खुला | १८-११-१९७५ | २९-१०-२०१८ | पदोन्नत | ४ | २०१८ | ११-०९-२०१९ | ३०-११-२०३३ | |
| ५१५ | श्रीमती | मैमुन्निसा संदे | खुला | ०२-०६-१९८२ | २६-१०-२०१८ | पदोन्नत | ५ | २०१८ | ११-०९-२०१९ | ३०-०६-२०४० | |
| ५१६ | श्रीमती | अपर्णा मोरे-धुमाळ | खुला | २३-०४-१९८० | २४-१०-२०१८ | पदोन्नत | ६ | २०१८ | ११-०९-२०१९ | ३०-०४-२०३८ | |
| ५१७ | श्रीमती | तृप्ती विजय कोलते | खुला | ३१-१०-१९८१ | २६-१०-२०१८ | पदोन्नत | ७ | २०१८ | ११-०९-२०१९ | ३१-१०-२०३९ | |
| ५१८ | श्रीमती | मिना निंबाळकर | खुला | २३-०७-१९७५ | २६-१०-२०१८ | पदोन्नत | ८ | २०१८ | ११-०९-२०१९ | ३०-०७-२०३३ | |
| ५१९ | श्रीमती | शैलजा पाटील | खुला | २४-०७-१९७७ | २९-१०-२०१८ | पदोन्नत | १० | २०१८ | ११-०९-२०१९ | ३१-०७-२०३५ | |
| ५२० | श्रीमती | रंजना बिचकर | विशेष मागास प्रवर्ग | २९-०५-१९८२ | १५-०९-२०१९ | पदोन्नत | ३ | २०१९ | १२-०९-२०१९ | ३१-०५-२०४० | |
| ५२१ | श्री. | अजित कुऱ्हाडे | खुला | ०२-०६-१९६६ | १८-०९-२०१९ | पदोन्नत | ६ | २०१९ | १४-०९-२०१९ | ३०-०६-२०२४ | |
| ५२२ | श्री. | श्रीनीवास ढाणे | खुला | ०५-१२-१९६८ | १६-०९-२०१९ | पदोन्नत | ९ | २०१९ | १०-११-२०१९ | ३१-१२-२०२६ | |
| | | दि.०१-०१-२०२० ते दि.३१-१२-२०२० | | | | | | | | | |
| ५२३ | श्री. | वैभवकुमार विलासराव पिलारे | खुला | ०१-०५-१९७१ | १६-०९-२०१९ | पदोन्नत | ११ | २०१९ | ०९-११-२०२० | ३०-०४-२०२९ | |
| | | दि.०१-०१-२०२१ ते दि.३१-१२-२०२१ | | | | | | | | | |
| ५२४ | श्री. | समीर मोहन यादव | खुला | ०४-१०-१९७९ | १७-०९-२०१९ | पदोन्नत | १४ | २०१९ | ०४-०२-२०२१ | ३१-१०-२०३७ | |
| | | | | | | | | | | | |

(शीतल तेली-उगले, भा.प्र.से.)
विभागीय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

नायब तहसिलदार संवर्गातून तहसिलदार संवर्गात पदोन्नतीचे अनुषंगाने सन २०१६-१७ ते सन २०२१-२२ (दि.०१/०१/२०१६-दि.३१/१२/२०१६ ते दि.०१/०१/२०२१-३१/१२/२०२१ याप्रमाणे) नियमितीकरणाचे अनुषंगाने दि.२०/०७/२०२६ रोजीच्या ज्येष्ठता सूचीवर प्राप्त हरकती व त्यावरील अभिप्राय.

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती अनिता देशमुख, तहसिलदार राधानगरी, जि.कोल्हापूर, दि.२८/०७/२०२६ (पदोन्नत :- ज्येष्ठता क्रमांक - ४८८ व नियमितीकरणाचा दिनांक :-०१/०४/२०१६) | तहसिलदार संवर्गामध्ये पदोन्नती सन २०१३ मध्ये झाली असलेने माझे नाव सेवा ज्येष्ठता यादी दि.०१/०१/१९९७ ते दि.३१/१२/२०१५ च्या यादीमध्ये समाविष्ठ करणेबाबत विनंती. | पदोन्नत नायब तहसिलदार संवर्गातील अधिकारी यांचे नियमितीकरण करताना जसे-जसे बिंदु रिक्त होईल त्यानुसार ज्येष्ठतेनुसार येणाऱ्या अधिकारी यांचा विचार करुनच नियमितीकरण केलेले आहे. इकडील कार्यालयामार्फत तयार करणेत आलेल्या नियमितीकरणास शासनस्तरावरून दि.२९/१२/२०२३ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार २०१५-१६ अखेर नियमितीकरणाचे अनुषंगाने तयार करणेत आलेल्या सुधारित जेष्ठता सूचीमध्ये आपले नावाचा समावेश नसलेमुळे विनंती अमान्य करणेत येत आहे. |
| २ | श्रीमती सुनिता मधुकर नेर्लीकर, तहसिलदार, सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, जि.कोल्हापूर, दि.२८/०७/२०२६ (पदोन्नत :- ज्येष्ठता क्रमांक - ४९१ व नियमितीकरणाचा दिनांक :-०१/०७/२०१६) | १.शासन आदेश दि.२९/०५/२०१३ नुसार माझी तहसीलदार संवर्गातील प्रथम नियुक्ती दि.०५/०६/२०१३ रोजी झालेली असून, श्रीमती अनिता शंकर देशमुख यांचीही त्याच दिवशी व त्याच आदेशाने नियुक्ती झालेली आहे. तथापि, त्यांना नियमितीकरण दिनांक ०१/०४/२०१६ व मला १०/०७/२०१६ असा नमूद करण्यात आला आहे. त्यामुळे मला देखील ०१/०४/२०१६ हा नियमितीकरण दिनांक देण्यात यावा.<br>२. श्रीमती अर्चना प्रशांत पाटील यांनी विभागीय परीक्षा विशेष बाब म्हणून दोन वाढीव संधी घेऊन उत्तीर्ण केली असल्याने त्यांना नियमित ज्येष्ठतेचा लाभ देणे योग्य नाही. मी विभागीय परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण केलेली असल्याने त्यांचा ज्येष्ठता क्रमांक माझ्यानंतर ठेवण्यात यावा.<br>३. माझी पदोन्नती दि.०५/०६/२०१३ रोजी झालेली असल्याने माझे नाव दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या ज्येष्ठता यादीत समाविष्ट करण्यात यावे. | १) नियमितीकरण करताना जसे-जसे बिंदु रिक्त होईल त्यानुसार ज्येष्ठतेनुसार येणाऱ्या अधिकारी यांचा विचार करुनच नियमितीकरण केलेले असून त्यास शासनस्तरावरुन दि.२९/१२/२०२३ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सबब दि.०१/०४/२०१६ हा नियमितीकरणाचा दिनांक देता येणार नाही.<br>२) श्रीमती नेर्लीकर यांचा ज्येष्ठता क्र.४९१ आहे व श्रीमती अर्चना प्रशांत पाटील यांचा ज्येष्ठता क्र.५१३ असा आहे. श्रीमती. नेर्लीकर यांनी घेतलेली हरकत विभागीय परिक्षेशी निगडीत असून विद्यमान ज्येष्ठतासूचीत त्याचा काहीही एक संबंध नाही. सदर बाब शासन स्तरावरील असलेने याबाबत स्वंतत्र अर्ज दाखल करावा. |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | | ३) दि.०१/०१/१९९७ ते दि.३१/१२/२०१५ या कालावधीतील शासनस्तरावरुन दि.२९/१२/२०२३ रोजीच्या नियमितीकरणानुसार ज्येष्ठता निश्चित झालेली असून त्यामध्ये आपले नावाचा समावेश नसल्याने पदोन्नतीचा दि.०५/०६/२०१३ या दिनांकानुसार नाव समाविष्ट करता येत नाही.<br>सबब विनंती अमान्य करण्यात येत आहे. |
| ३ | श्री.विकास शरद भालेराव, तहसिलदार तथा विशेष कार्य अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई-३२, दि.२९/०७/२०२६ (पदोन्नत :- ज्येष्ठता क्रमांक - ४९२ व नियमितीकरणाचा दिनांक :-०१/०८/२०१६) | १. दिनांक २०/७/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेली तहसीलदार संवर्गाची ज्येष्ठता सूची तयार करताना नियमितीकरण करण्याकरिता देण्यात आलेल्या तारखा चुकीच्या आणि अन्यायकारक आहेत. कारण तहसीलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग (Cadre) असल्याने विभागस्तरावर देण्यात आलेला ज्येष्ठता क्रमांक हा ज्या निकषांच्या आधारे देण्यात आलेला आहे ते निकष त्या त्या वर्षी पदोन्नती करता पात्र असलेल्या सर्व महसूली विभागातील, सर्व अधिकाऱ्यांना (सर्व जात प्रवर्गासह) समानतेने लागू होणे आवश्यक आहे.<br>२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २००१ च्या गुणानुक्रम यादीनुसार राज्याची एकत्रित यादी तयार करुन आयोगाकडे निवड झालेला जातीचा प्रवर्ग व प्रत्यक्ष व्यक्ती ज्या जातीच्या प्रवर्गात मोडते त्या प्रवर्गाचा शिल्लक बिंदू, Joining Date या निकषांचा प्राधान्याने विचार करुन त्यानंतर नियमितीकरणाबाबत शासन अधिनियमानुसार पदोन्नतीची राज्यस्तरावर अंतिम यादी तयार करुन त्यामध्ये सरळ सेवा व पदोन्नतीच्या शिल्लक कोटा प्रमाणे एकत्रित राज्यस्तरीय अंतिम सेवा ज्येष्ठता सूची तयार करणे आवश्यक व नियमानुसार योग्य आहे. तहसीलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग असल्याने तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरण हे नियमानुसार राज्यस्तरावरुन होणे अपेक्षित आहे.<br>३. नायब तहसीलदार तसेच तहसीलदार संवर्गातील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य स्तरावरून भरली जात असल्याने तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरण हे नियमानुसार विभागीय स्तरावरून न होता राज्यस्तरावरुन होणे आवश्यक असताना आणि सदर यादी नायब तहसीलदार संवर्गाच्या राज्यस्तरीय अंतिम सेवा ज्येष्ठता यादीला अनुसरून करणे आवश्यक असताना देखील पुन्हा विभागीय स्तरावरच नियमितीकरण करून प्रसिद्ध करण्यात आली आहे. | १) सन १९९७-९८ ते २०२१-२२ पर्यंत नियमितीकरण करताना वेळोवेळी असलेल्या प्रचलित नियम व निकषानुसार विभागस्तरावरुन तयार करणेत आलेले आहे. त्यानुसार सन १९९७-९८ ते २०१५-१६ (दि.३१/१२/२०१५ अखेर) व सन २०१६-१७ ते २०२१-२२ (दि.३१/१२/२०२१ अखेर) यानुसार दोन टप्प्यानुसार सदर यादी प्रसिध्द करणेत आलेली आहे.<br>२) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील राजपत्र दि.२७/०४/१९८९ नुसार तहसिलदारांचे सेवाप्रवेश नियम १९८९ प्रसिध्द करणेत आलेले आहे. त्यानुसार तहसिलदारांचा संवर्ग विभागीय संवर्ग असेल आणि त्या संवर्गात नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांची संबंधित विभागाच्या कोणत्याही भागात पदस्थापना, बदली किंवा प्रतिनियुक्ती होऊ शकेल, असे नमूद केले आहे. तसेच शासन निर्णय दि.१०/०५/२०२१ अन्वये तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग म्हणून घोषित करणेत आलेला आहे. यास्तव शासनाने वेळोवेळी बैठक आयोजित करुन सदर बैठकीत दिलेल्या |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | ४. पुणे विभागातील पदोन्नत तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे महसूल विभाग, पुणे यांनी दिनांक ३/८/२०२३ रोजी तहसीलदार संवर्गाची दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीची एकत्रित तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची प्रसिध्द केली होती. मी तहसीलदार संवर्गात सन २०१३ साली रुजू झालो असतानाही सदर यादीमध्ये माझे नाव चुकीच्या ठिकाणी समाविष्ट केलेले असल्यामुळे सदर यादीवर दिनांक ०७/०९/२०२३ रोजी हरकत नोंदविण्यात आली होती.<br>५. त्यानंतर तहसीलदार संवर्गाच्या दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीच्या दि.२९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या राज्यस्तरीय एकत्रित तात्पुरत्या जेष्ठता सूचीचे अवलोकन केले असता सन २००२ ते २००७ च्या M.P.S.C. बॅचचे नायब तहसीलदार हे सन २००१ च्या M.P.S.C. बॅचच्या नायब तहसीलदार यांना तहसीलदार संवर्गात सेवाजेष्ठ दर्शविले असल्याचे दिसून येत असल्यामुळे त्याचप्रमाणे सदरचे नियमितीकरण हे राज्यस्तरावरुन न करता विभाग स्तरावरुन केले असल्याने सेवा जेष्ठता सूची मध्ये जेष्ठता क्रमांकाचे अनियमितता आढळून येत आहे. त्यामुळे नायब तहसीलदार संवर्ग तसेच तहसीलदार संवर्ग हे दोन्ही संवर्ग राज्यस्तरीय संवर्ग असल्याने नायब तहसीलदार तसेच तहसीलदार संवर्गाची सेवा ज्येष्ठता यादी व नियमितीकरण राज्यस्तरावरुन करण्यात यावे. या मुद्याच्या अनुषंगाने दि.२९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या राज्यस्तरीय एकत्रित तात्पुरत्या जेष्ठता सूचीवर देखील दिनांक ११/१/२०२४ रोजी आपले मार्फत महसूल व वन विभागाकडे आक्षेप नोंदविण्यात आले होते. मी घेतलेली हरकत ही मा. विभागीय आयुक्त पुणे व मा. महाराष्ट्र शासन महसूल विभाग यांनी मान्य केलेली असुन त्यानुसार मला तहसीलदार संवर्गाची दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५या कालावधीची राज्यस्तरावरील एकत्रित अंतिम सेवाज्येष्ठता सूची दि.१३/१०/२०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम सेवाज्येष्ठता यादीत राज्य स्तरावरील ज्येष्ठता क्रमांक २१४८ तसेच तहसीलदार संवर्गातील ज्येष्ठता दिनांक / ज्येष्ठतेचा नियमित दिनांक ०१/०९/२०१० दिलेला आहे. सदर यादी प्रसिद्ध करताना महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकात मुद्दा क्र. ६ मध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.<br>"दि.२९.१२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूचीवर ज्या अधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत आक्षेप / निवेदने सादर केलेले आहेत, | मार्गदर्शनानुसार उक्त कालावधीतील नियमितीकरण हे विभागस्तरावरुन करणेत आलेले असून त्यास शासनाकडील दि.२९/१२/२०२३ अन्वये मंजूरी मिळालेली आहे.<br>३) सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>४) त्या-त्या वेळेस लागू असलेले शासन निर्णय व हरकत/सूचना यांचा विचार करुनच नियमितीकरण करुन दि.०१/०१/२०१५ व दि.०१/०१/२०२२ या दिनांकावर आधारित ज्येष्ठता सूची प्रसिध्द करणेत आलेली आहे.<br>५) इकडील ज्ञापन दि.०४/०९/२०२३ अन्वये प्रसिध्द करणेत आलेल्या सुधारित ज्येष्ठता सुचीत आपले नावासमोर (अ.क्र.४९५) दि.०१/०८/२०१६ हा नियमितीकरणाचा दिनांक दर्शविणेत आलेला आहे. त्यानुसार शासनाने दि.२९/१२/२०२३ अन्वये दि.०१/०१/१९९७ ते दि.३१/१२/२०१५ या कालावधीची राज्यस्तरावरील एकत्रित तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द करणेत आलेली असून सदर यादीत आपले नावाचा समावेश नाही. सदर यादीवर प्राप्त हरकती/ सूचनांचे अनुषंगाने इकडील कार्यालयामार्फत दि.०६/०२/२०२४ अन्वये अहवाल सादर केला आहे. तद्नंतर शासन निर्णय दि.१३/१०/२०२५ अन्वये अंतीम यादी प्रसिध्द करणेत आली आहे. सदर यादीमध्ये आपले नावाचा उल्लेख २१४८ वर असून ज्येष्ठता दिनांक ०१/०९/२०१० दर्शविणेत आलेला आहे. सदर दिनांक हा आपण सादर |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
| --- | --- | --- | --- |
| | | त्यांच्या आक्षेपांचे तथायोग्य निराकरण करून संबंधित अधिकाऱ्यास विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत लेखी स्वरूपात कळविण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल."<br>सदर आक्षेपांबाबत आज अखेर मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून आम्हांला काहीही लेखी कळविण्यात आलेले नाही. सदर प्रसिद्ध यादीनुसार उपजिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देखील देण्यात आलेल्या आहेत. त्यात आमच्या नंतर शासन सेवेत रुजू झालेल्या अधिकाऱ्याना देखील उपजिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे. संपूर्ण राज्यामध्ये आमच्या batch मधील व त्यानंतरच्या batch मधील अधिकारी यांना पदोन्नती मिळालेली असतांना केवळ पुणे विभागातील तहसीलदार यांना पदोन्नती मिळालेली नसल्याने पुणे विभागातील तहसीलदारांवर खूपच मोठा अन्याय झालेला आहे.<br>सदर बाबत आम्ही मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचेकडे याचिका क्र.OA ५३८/२२६ दाखल केलेली आहे.<br>६. त्यानंतर दिनांक २८/१०/२०२५ रोजी आम्ही मा. महसूल मंत्री महोदय यांच्याकडे उपजिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नतीसाठी अंतिम निवड सूची मध्ये आमची नावे समाविष्ठ करणे बाबत निवेदन सादर केले होते. सदर निवेदनात उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची तपासणी करून त्याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत शासन पत्र क्र. सेवाज्ये २०२३/प्र.क्र.२१४ /आस्था-३, दिनांक २९/१०/२०२५ अन्वये मा. विभागीय आयुक्त, पुणे यांना निर्देशित केले होते.<br>७. सदर पत्राचे अनुषंगाने आपले कार्यालयाकडून क्र. मह / आस्था १ (ई) / कावी /१६७/२०२६ दिनांक ११/०३/२०२६ रोजी महसूल व वन विभागास अहवाल सादर करणेत आलेला आहे.<br>राज्यातील काही विभागांनी तहसीलदार संवर्गाचा पदोन्नती कोटा ७५ % वापरलेला आहे. परंतु पुणे विभागाने यापूर्वी पदोन्नती कोटा ६७% इतकाच वापरलेला असल्याने तो ७५ % वापरून दुरुस्त प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावामध्ये आम्हाला देण्यात आलेला नियमितीकरणाचा दिनांक आणि दिनांक २०/०७/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जेष्टतासूचीतील नियमितीकरणाचा दिनांक वेगवेगळे आहेत.<br>उपरोक्त बाबी वगळता सदर यादीमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत -<br>१. पुणे विभागातील पदोन्नत तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने दिनांक | केलेल्या हरकतीमुळे नसून मानीव दिनांक मिळणेच्या अनुषंगाने स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत आलेला असून त्या संदर्भाने दिला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचेकडे प्रलंबित OA क्र. ५३८/२०२६ मध्ये अद्याप निर्णय झालेला नाही.<br>६ व ७) पदोन्नत तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरणाचा ७५% ते ६७% (आवश्यकतेप्रमाणे प्रवाही) याप्रमाणे प्रस्ताव इकडील पत्र दि.११/०३/२०२६ अन्वये शासनास सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्ताव दि.१८/०६/२०२६ रोजीच्या शासन पत्रात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने निकाली काढणेत आलेला आहे.<br>शासन, महसूल व वन विभाग यांजकडील अधिसूचना दिनांक २०/०७/२०२६ नुसार सेवाप्रवेश नियमावली दुरुस्ती करुन तहसिलदार संवर्गातील सरळसेवा व पदोन्नती कोटा अनुक्रमे ६० : ४० असे प्रमाण निश्चित करणेत आले आहे.<br>सबब विनंती अमान्य करण्यात येत आहे. |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | २०/७/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या ज्येष्ठता सूचीमध्ये माझे नाव अनु क्र. ४९२ वर नमूद केले आहे. माझा तहसीलदार संवर्गातील प्रथम नियुक्ती दिनांक १२/०८/२०१३ असूनही नियमितीकरणाचा दिनांक ०१/०८/२०१६ दर्शविण्यात आला आहे.<br>२. दि.२९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या राज्यस्तरीय एकत्रित तात्पुरत्या जेष्ठता सूचीवर दिनांक ११/१/२०२४ रोजी आपले मार्फत महसूल व वन विभागाकडे आक्षेप नोंदविण्यात आले होते. मी घेतलेली हरकत ही मा. विभागीय आयुक्त पुणे व मा. महाराष्ट्र शासन महसूल विभाग यांनी मान्य केलेली असुन त्यानुसार मला तहसीलदार संवर्गाची दि.०९/०९/१९९७ ते ३१/१२/२०१५या कालावधीची राज्यस्तरावरील एकत्रित अंतिम सेवाज्येष्ठता सूची दि.१३/१०/२०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम सेवाज्येष्ठता यादीत राज्य स्तरावरील ज्येष्ठता क्रमांक २१४८ तसेच तहसीलदार संवर्गातील ज्येष्ठता दिनांक / ज्येष्ठतेचा नियमित दिनांक ०१/०९/२०१० दिलेला असतानाही पुन्हा दिनांक २०/०७/२०२६ रोजी पुणे विभागातील तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने दिनांक ०१/०१/२०१६ ते दिनांक ०१/०९/२०२१ या कालावधीकरीता प्रसिध्द केलेल्या प्रारुप ज्येष्ठता सूचीमध्ये पुनःश्च मला तहसीलदार संवर्गातील नियमितीकरणाचा दिनांक ०१/०८/२०१६ व अनुक्रमांक ४९२ दर्शविलेला आहे हे पूर्णतः चुकीचे आहे.<br>तरी माझी आपणास नम्र विनंती आहे की पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाने दि.२०/०७/२०२६ रोजी प्रसिध्द केलेले पुणे विभागातील पदोन्नत तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने केलेल्या दि.०१/०१/२०१६ ते दि.०१/०१/२०२१ या जेष्ठता सूचीत देर्शविलेले माझे नाव चुकीच्या ठिकाणी व चुकीच्या नियमितीकरणाच्या दिनांकावर घेतलेले असुन महाराष्ट्र शासन महसूल विभागाच्या दि.१३/१०/२०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ च्या अंतिम राज्यस्तरीय यादीमध्ये नमुद अ.क्र.२१४८ तसेच तहसीलदार संवर्गातील ज्येष्ठता दिनांक/ज्येष्ठतेचा नियमित दि.०१/०९/२०१० देण्यात यावा. वरील प्रमाणे माझा आक्षेप असून सदर आक्षेपांची नोंद घेवून तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरण राज्य स्तरावरून करून मला तहसीलदार संवर्गाच्या सेवा ज्येष्ठता यादी मध्ये माझ्या दि. ०१/०९/२०१० या नियमितीकरणाच्या दिनांकानुसार राज्यस्तरीय अंतिम यादीतील नमुद अनुक्रमांक २१४८ कायम ठेवणेबाबत इकडील मार्फत मा. अप्पर मुख्य सचिव महसूल व वन विभाग महाराष्ट्र राज्य यांचेकडे शिफारस करणेस विनंती आहे. | |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| ४ | श्री.बालाजी वसंतराव सोमवंशी, तहसिलदार अहेरी, जि.गडचिरोली दि.२८/०७/२०२६ (पदोन्नत:- ज्येष्ठता क्रमांक - ४९४ व नियमितीकरणाचा दिनांक :-०१/०९/२०१६) | १. दिनांक २०/७/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेली तहसीलदार संवर्गाची ज्येष्ठता सूची तयार करताना नियमितीकरण करण्याकरिता देण्यात आलेल्या तारखा चुकीच्या आणि अन्यायकारक आहेत. कारण तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग (Cadre) असल्याने विभागस्तरावर देण्यात आलेला ज्येष्ठता क्रमांक हा ज्या निकषांच्या आधारे देण्यात आलेला आहे ते निकष त्या त्या वर्षी पदोन्नती करता पात्र असलेल्या सर्व महसूली विभागातील, सर्व अधिकाऱ्यांना (सर्व जात प्रवर्गासह) समानतेने लागू होणे आवश्यक आहे.<br>२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २००१ च्या गुणानुक्रम यादीनुसार राज्याची एकत्रित यादी तयार करुन आयोगाकडे निवड झालेला जातीचा प्रवर्ग व प्रत्यक्ष व्यक्ति ज्या जातीच्या प्रवर्गात मोडते त्या प्रवर्गाचा शिल्लक बिंदू. Joining Date या निकषांचा प्राधान्याने विचार करुन त्यानंतर नियमितीकरणाबाबत शासन अधिनियमानुसार पदोन्नती ची राज्यस्तरावर अंतिम यादी तयार करुन त्यामध्ये सरळ सेवा व पदोन्नतीच्या शिल्लक कोटा प्रमाणे एकत्रित राज्यस्तरीय अंतिम सेवा ज्येष्ठता सूची तयार करणे आवश्यक व नियमानुसार योग्य आहे. तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग असल्याने तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरण हे नियमानुसार राज्यस्तरावरुन होणे अपेक्षित आहे.<br>३. नायब तहसिलदार तसेच तहसिलदार संवर्गातील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य स्तरावरून भरली जात असल्याने तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरण हे नियमानुसार विभागीय स्तरावरून न होता राज्यस्तरावरुन होणे आवश्यक असताना आणि सदर यादी नायब तहसीलदार संवर्गाच्या राज्यस्तरीय अंतिम सेवा ज्येष्ठता यादीला अनुसरून करणे आवश्यक असताना देखील पुन्हा विभागीय स्तरावरच नियमितीकरण करून प्रसिद्ध करण्यात आली आहे<br>४. Tahsildar Recruitment Rule १९८९ मध्ये तहसीलदार संवर्ग हा विभागीय संवर्ग असेल असे नमूद केलेले असले तरी तहसीलदार संवर्गाची सेवा जेष्टता यादी विभाग स्तरावर ठेवण्यात यावी याबाबत उल्लेख केलेला नाही. ज्या संवर्गाच्या बाबतीत सेवा जेष्टता यादीबाबत RR मध्ये स्पष्टता नसेल त्या संवर्गासाठी Maharashtra Civil Services (Regulation of Seniority) Rules, १९८२ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१/०६/२०२१ (महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली लागू करणेबाबत निर्देश आहेत.<br>५. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई दि.२१/०६/१९८२ रोजीची | १) सन १९९७-९८ ते २०२१-२२ पर्यंत नियमितीकरण करताना वेळोवेळी असलेल्या प्रचलित नियम व निकषानुसार विभागस्तरावरुन तयार करणेत आलेले आहे. त्यानुसार सन १९९७-९८ ते २०१५-१६ (दि.३१/१२/२०१५ अखेर) व सन २०१६-१७ ते २०२१-२२ (दि.३१/१२/२०२१ अखेर) यानुसार दोन टप्प्यानुसार सदर यादी प्रसिध्द करणेत आलेली आहे.<br>२) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील राजपत्र दि.२७/०४/१९८९ नुसार तहसिलदारांचे सेवाप्रवेश नियम १९८९ प्रसिध्द करणेत आलेले आहे. त्यानुसार तहसिलदारांचा संवर्ग विभागीय संवर्ग असेल आणि त्या संवर्गात नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांची संबंधित विभागाच्या कोणत्याही भागात पदस्थापना, बदली किंवा प्रतिनियुक्ती होऊ शकेल, असे नमूद केले आहे. तसेच शासन निर्णय दि.१०/०५/२०२१ अन्वये तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग म्हणून घोषित करणेत आलेला आहे. यास्तव शासनाने वेळोवेळी बैठक आयोजित करुन सदर बैठकीत दिलेल्या मार्गदर्शनानुसार उक्त कालावधीतील नियमितीकरण हे विभागस्तरावरुन करणेत आलेले असून त्यास शासनाकडील दि.२९/१२/२०२३ अन्वये मंजूरी मिळालेली आहे.<br>३) सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>४) सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>५, ६ व ७) सदर यादी फक्त सेवाज्येष्ठता यादी |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | नियमावली, महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१/०६/२०२१ (महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली) अन्वये सेवाजेष्ठता यादी तयार केलेचे दिसून येत नाही.<br>६. Maharashtra Civil Services (Regulation of Seniority) Rules, १९८२ कलम ४ (२) नुसार पोट नियम १ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील नेमणुकीसाठी एकाच तुकडीत निवड होवून थेट भरती झालेल्या व्यक्तींनी नेमणूक आदेश निघाल्याच्या तारखेपासून तीन दिवसाच्या आत किंवा सक्षम प्राधिकारी स्वविवेकानुसार वाढवून देईल अशा कालावधीत जर नेमणुकीचा स्वीकार केला असेल तर त्यांच्या आपसातील ज्येष्ठता, आयोगाने व निवड मंडळाने किंवा प्रकरण परत्वे सक्षम प्राधिकाऱ्याकडून नामनिर्देशनाद्वारे झालेल्या थेट भरतीच्या बाबतीत सदर सक्षम प्राधिकाऱ्याने लावलेल्या पसंतीक्रमानुसार निर्धारित केली जाईल (ब) निवड सूचीतून पदोन्नती मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अशा निवडसूचीत त्यांची नावे ज्या क्रमाने असतील त्याच क्रमानुसार त्यांची आपसातील ज्येष्ठता राहील, जर निवडसूची दोन भागात तयार केलेली असेल तर, पहिल्या भागात विनशर्त निवड झालेल्यांची नावे अंतर्भूत असतील व दुसऱ्या भागात निवड झालेल्यांची नावे असतील. पहिल्या भागात समाविष्ट झालेल्या सर्व व्यकर्तींचा क्रम दुसऱ्या भागातील समाविष्ट केलेल्या व्यक्तींच्या वर लागेल. परंतु निवडसूचीतील नावे ज्या क्रमाने लावलेली आहेत तो क्रम मागाहून आढावा घेतल्यामुळे बदलण्यात आला तर, संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचा ज्येष्ठताक्रम त्यांच्या या सुधारित क्रमानुसार फेरमांडणी करण्यात येऊन निर्धारित केला जाईल.<br>७. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील कलम ४ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक निर्धारित करणे :- पोट नियम (२) [॥] पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा ज्येष्ठता क्रमांक -मध्ये अशी तरतूद केली आहे की, खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नियमित निवडसूचीतून पदोन्नती मिळालेले शासकीय कर्मचारी, विहित मुदतीत पदोन्नतीच्या पदावर रुजू झाल्यास, त्यांचा आपापसांतील ज्येष्ठतेचा क्रमांक हा, निवडसूचीत त्यांची नावे ज्या क्रमाने दर्शवली आहेत त्याच क्रमानुसार निर्धारित केली जाईल, अशी तरतूद आहे.<br><br>८. पुणे विभागातील पदोन्नत तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने विभागीय | नसून नियमितीकरणांअती तयार करणेत आलेली ज्येष्ठता सूची आहे.<br>८) आपण दाखल केलेल्या दि.११/०८/२०२३ रोजीच्या हरकती/सुचनावर कार्यवाही करुन इकडील दि.०४/०९/२०२३ रोजीच्या ज्ञापनानुसार यादी पुणे विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांचे ई-मेल व राष्ट्रीय सूचना केंद्र यांचेमार्फत प्रसिध्दी करणेत आलेली आहे.<br>९) शासन दि.३१/१०/२०२५ अन्वये प्रसिध्द करणेत आलेल्या ज्येष्ठतासूची वरील हरकती/ सुचनांचे निदान अथवा लेखी उत्तर इकडील कार्यालयास प्राप्त न झालेने तसे कळविणेत आलेले नाही. शासनाकडून तसे प्राप्त झालेनंतर पुणे विभागातील जिल्हाधिकारी व राष्ट्रीय सूचना केंद्र पुणे यांचेमार्फत प्रसिध्द करणेची तजवीज ठेवली आहे.<br>१० व ११) पदोन्नत नायब तहसिलदार यांचा नियमितीकरण करताना जसे-जसे बिंदु रिक्त होईल त्यानुसार ज्येष्ठतेनुसार येणाऱ्या अधिकारी यांचा विचार करुनच नियमितीकरण केलेले आहे. सरळसेवेने रुजु झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांना सेवेत रुजु झाल्याचा दिनांक अथवा शासनाने निर्धारित केलेला दिनांक हा नियमितीकरणाचा दिनांक नसून फक्त ज्येष्ठतेचा दिनांक दर्शविणेत आलेला आहे.<br>सबब विनंती अमान्य करण्यात येत आहे. |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | आयुक्त कार्यालय पुणे महसूल विभाग पुणे यांनी दिनांक ३/८/२०२३ रोजी तहसिलदार संवर्गाची दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीची एकत्रित तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची प्रसिध्द केली होती. मी तहसीलदार संवर्गात सन २०१४ साली रुजू झाले असतानाही सदर यादीमध्ये आमची नावे समाविष्ट नसल्यामुळे सदर यादीवर दिनांक ११/८/२०२३ रोजी हरकती नोंदविण्यात आल्या होत्या. तथापि सदर हरकतीबाबत काय निर्णय घेण्यात आला याबाबत मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून कोणतेही लेखी उत्तर प्राप्त झालेले नाही. याबाबत चौकशी केली असता आमची नावे ज्येष्ठत्ता यादीत नसल्यामुळे आमची विनंती अमान्य करण्यात आल्याचे समजले. ज्येष्ठता यादीत नाव समाविष्ठ नाही या कारणास्तव केलेल्या विनंती हरकत अर्जाला ज्येष्ठता यादीत नाव नसल्याने विनंती अमान्य केलेची बाब अनाकलनीय आहे.<br>९. त्यानंतर तहसिलदार संवर्गाच्या दि. ०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीच्या दि.२९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या राज्यस्तरीय एकत्रित तात्पुरत्या जेष्ठता सूचीचे अवलोकन केले असता सन २००२ ते २००७ च्या M.P.S.C. बॅचचे नायब तहसिलदार हे सन २००१ च्या M.P.S.C. बॅचच्या नायब तहसिलदार यांना तहसिलदार संवर्गात सेवाजेष्ठ दर्शविले असल्याचे दिसून येत असल्यामुळे त्याचप्रमाणे सदरचे नियमितीकरण हे राज्यस्तरावरुन न करता विभाग स्तरावरुन केले असल्याने सेवा जेष्ठता सूची मध्ये जेष्ठता क्रमांकाचे अनियमितता आढळून येत आहे. त्यामुळे नायब तहसिलदार संवर्ग तसेच तहसिलदार संवर्ग हे दोन्ही संवर्ग राज्यस्तरीय संवर्ग असल्याने नायब तहसिलदार तसेच तहसिलदार संवर्गाची सेवा ज्येष्ठता यादी व नियमितीकरण राज्यस्तरावरुन करण्यात यावे. या मुद्याच्या अनुषंगाने दि.२९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या राज्यस्तरीय एकत्रित तात्पुरत्या जेष्ठता सूचीवर देखील दिनांक ११/१/२०२४ रोजी आपले मार्फत महसूल व वन विभागाकडे आक्षेप नोंदविण्यात आले होते. तथापि सदर आक्षेपांचा विचार न करता दिनांक १३/१०/२०२५ रोजी तहसिलदार संवर्गाची दि. ०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीची अंतिम सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आली. सदर यादी प्रसिद्ध करताना महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकात मुद्दा क्र ६ मध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.<br>"दि.२९.१२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूचीवर ज्या | |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | अधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत आक्षेप / निवेदने सादर केलेले आहेत, त्यांच्या आक्षेपांचे तथायोग्य निराकरण करून संबंधित अधिकाऱ्यास विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत लेखी स्वरूपात कळविण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल."<br>सदर आक्षेपांबाबत आज अखेर मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून आम्हांला काहीही कळविण्यात आलेले नाही . सदर प्रसिद्ध यादीनुसार उपजिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देखील देण्यात आलेल्या आहेत. त्यात आमच्या नंतर शासन सेवेत रुजू झालेल्या अधिकाऱ्याना देखील उपजिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे. संपूर्ण राज्यामध्ये आमच्या batch मधील व त्यानंतरच्या batch मधील अधिकारी यांना पदोन्नती मिळालेली असतांना केवळ पुणे विभागातील तहसीलदार यांना पदोन्नती मिळालेली नसल्याने पुणे विभागातील तहसीलदारांवर खूपच मोठा अन्याय झालेला आहे.<br>सदर बाबत आम्ही मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचेकडे Petition दाखल केलेली आहे. उपरोक्त बाबी वगळता सदर यादीमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत<br>१०. पुणे विभागातील पदोन्नत तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने दिनांक २०/७/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या ज्येष्ठता सूचीमध्ये माझे नाव अनु क्र.४९४ वर नमूद आहे माझा तहसीलदार संवर्गातील प्रथम नियुक्ती दिनांक १०/०५/२०१३ असूनही नियमितीकरणाचा दिनांक ०१/०९/२०१६ दर्शविण्यात आला आहे.<br>११. अनु क्र. ४८९ व ४९० वर अनुक्रमे संगमेश कोडे आणि स्वप्नील रावडे या सरळसेवा तहसीलदार यांचा समावेश केलेला आहे. सदर दोन्ही तहसीलदार हे सदर संवर्गात दिनांक २/५/२०१६ रोजी म्हणजे माझे नंतर रुजू झाले आहेत. त्याचप्रमाणे सदर दोन्ही तहसिलदार यांच्या नावासमोर शेरा कॉलम मध्ये अनुक्रमे अमरावती विभाग आणि नागपूर विभाग असे दर्शविण्यात आले आहे. अनु क्र ५०० वर अभिजीत जाधव या सरळसेवा तहसीलदार यांचा समावेश केलेला आहे. सदर तहसीलदार हे सदर संवर्गात दिनांक १/८/२०१७ रोजी म्हणजे माझे नंतर रुजू झाले आहेत. सदर तहसिलदार यांच्या नावासमोर शेरा कॉलम मध्ये नाशिक विभाग असे दर्शविण्यात आले आहे. पुणे विभागातील सेवा ज्येष्ठता यादीत अन्य विभागातील तहसीलदार यांचा समावेश का करण्यात आला आहे याचा बोध होत नाही. | |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| ५ | श्री.ऋषिकेत कांतीलाल शेळके, तहसिलदार गडहिंग्लज, जि.कोल्हापूर, दि.२८/०७/२०२६ (पदोन्नत:- ज्येष्ठता क्रमांक - ४९५ व नियमितीकरणाचा दिनांक :-०२/०४/२०१७) | १. दिनांक २०/०७/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेली तहसीलदार संवर्गाची ज्येष्ठता सूची तयार करताना नियमितीकरण करण्याकरिता देण्यात आलेल्या तारखा चुकीच्या आणि अन्यायकारक आहेत. कारण तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग (Cadre) असल्याने विभागस्तरावर देण्यात आलेला ज्येष्ठता क्रमांक हा ज्या निकषांच्या आधारे देण्यात आलेला आहे ते निकष त्या त्या वर्षी पदोन्नती करता पात्र असलेल्या सर्व महसूली विभागातील, सर्व अधिकाऱ्यांना (सर्व जात प्रवर्गासह) समानतेने लागू होणे आवश्यक आहे.<br>२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २००१ च्या गुणानुक्रम यादीनुसार राज्याची एकत्रित यादी तयार करुन आयोगाकडे निवड झालेला जातीचा प्रवर्ग व प्रत्यक्ष व्यक्ति ज्या जातीच्या प्रवर्गात मोडते त्या प्रवर्गाचा शिल्लक बिंदू, Joining Date या निकषांचा प्राधान्याने विचार करुन त्यानंतर नियमितीकरणाबाबत शासन अधिनियमानुसार पदोन्नती ची राज्यस्तरावर अंतिम यादी तयार करुन त्यामध्ये सरळ सेवा व पदोन्नतीच्या शिल्लक कोटा प्रमाणे एकत्रित राज्यस्तरीय अंतिम सेवा ज्येष्ठता सूची तयार करणे आवश्यक व नियमानुसार योग्य आहे. तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग असल्याने तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरण हे नियमानुसार राज्यस्तरावरुन होणे अपेक्षित आहे.<br>३. नायब तहसिलदार तसेच तहसिलदार संवर्गातील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य स्तरावरून भरली जात असल्याने तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरण हे नियमानुसार विभागीय स्तरावरून न होता राज्यस्तरावरुन होणे आवश्यक असताना आणि सदर यादी नायब तहसीलदार संवर्गाच्या राज्यस्तरीय अंतिम सेवा ज्येष्ठता यादीला अनुसरून करणे आवश्यक असताना देखील पुन्हा विभागीय स्तरावरच नियमितीकरण करून प्रसिद्ध करण्यात आली आहे<br>४. Tahsildar Recruitment Rule १९८९ मध्ये तहसीलदार संवर्ग हा विभागीय संवर्ग असेल असे नमूद केलेले असले तरी तहसीलदार संवर्गाची सेवा जेष्टता यादी विभाग स्तरावर ठेवण्यात यावी याबाबत उल्लेख केलेला नाही. ज्या संवर्गाच्या बाबतीत सेवा जेष्टता यादीबाबत RRमध्ये स्पष्टता नसेल त्या संवर्गासाठी Maharashtra Civil Services (Regulation of Seniority) Rules, १९८२ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१/०६/२०२१ (महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली लागू करणेबाबत निर्देश आहेत.<br>५. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई दि.२१/०६/१९८२ रोजीची | १) सन १९९७-९८ ते २०२१-२२ पर्यंत नियमितीकरण करताना वेळोवेळी असलेल्या प्रचलित नियम व निकषानुसार विभागस्तरावरुन तयार करणेत आलेले आहे. त्यानुसार सन १९९७-९८ ते २०१५-१६ (दि.३१/१२/२०१५ अखेर) व सन २०१६-१७ ते २०२१-२२ (दि.३१/१२/२०२१ अखेर) यानुसार दोन टप्प्यानुसार सदर यादी प्रसिध्द करणेत आलेली आहे.<br>२) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील राजपत्र दि.२७/०४/१९८९ नुसार तहसिलदारांचे सेवाप्रवेश नियम १९८९ प्रसिध्द करणेत आलेले आहे. त्यानुसार तहसिलदारांचा संवर्ग विभागीय संवर्ग असेल आणि त्या संवर्गात नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांची संबंधित विभागाच्या कोणत्याही भागात पदस्थापना, बदली किंवा प्रतिनियुक्ती होऊ शकेल, असे नमूद केले आहे. तसेच शासन निर्णय दि.१०/०५/२०२१ अन्वये तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग म्हणून घोषित करणेत आलेला आहे. यास्तव शासनाने वेळोवेळी बैठक आयोजित करुन सदर बैठकीत दिलेल्या मार्गदर्शनानुसार उक्त कालावधीतील नियमितीकरण हे विभागस्तरावरुन करणेत आलेले असून त्यास शासनाकडील दि.२९/१२/२०२३ अन्वये मंजूरी मिळालेली आहे<br>३) सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>४) सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>५, ६ व ७) सदर यादी फक्त सेवाज्येष्ठता यादी |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | नियमावली. महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१/०६/२०२१ (महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली) अन्वये सेवाजेष्ठता यादी तयार केलेचे दिसून येत नाही.<br>६. Maharashtra Civil Services (Regulation of Seniority) Rules, १९८२ कलम ४ (२) नुसार पोट नियम । मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील नेमणुकीसाठी एकाच तुकडीत निवड होवून थेट भरती झालेल्या व्यक्तींनी नेमणूक आदेश निघाल्याच्या तारखेपासून तीन दिवसाच्या आत किंवा सक्षम प्राधिकारी स्वविवेकानुसार वाढवून देईल अशा कालावधीत जर नेमणुकीचा स्वीकार केला असेल तर त्यांच्या आपसातील ज्येष्ठता, आयोगाने व निवड मंडळाने किंवा प्रकरण परत्वे सक्षम प्राधिकाऱ्याकडून नामनिर्देशनाद्वारे झालेल्या थेट भरतीच्या बाबतीत सदर सक्षम प्राधिकाऱ्याने लावलेल्या पसंतीक्रमानुसार निर्धारित केली जाईल (ब) निवड सूचीतून पदोन्नती मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अशा निवडसूचीत त्यांची नावे ज्या क्रमाने असतील त्याच क्रमानुसार त्यांची आपसातील ज्येष्ठता राहील, जर निवडसूची दोन भागात तयार केलेली असेल तर, पहिल्या भागात बिनशर्त निवड झालेल्यांची नावे अंतर्भूत असतील व दुसऱ्या भागात निवड झालेल्यांची नावे असतील. पहिल्या भागात समाविष्ट झालेल्या सर्व व्यक्तींचा क्रम दुसत्या भागातील समाविष्ट केलेल्या व्यक्तींच्या वर लागेल. परंतु निवडसूचीतील नावे ज्या क्रमाने लावलेली आहेत तो क्रम मागाहून आढावा घेतल्यामुळे बदलण्यात आला तर, संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचा ज्येष्ठताक्रम त्यांच्या या सुधारित क्रमानुसार फेरमांडणी करण्यात येऊन निर्धारित केला जाईल.<br>७. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील कलम ४ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक निर्धारित करणे: पोट नियम (२) \|॥\| पदोनतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा ज्येष्ठता क्रमांक -मध्ये अशी तरतूद केली आहे की, खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नियमित निवडसूचीतून पदोन्नती मिळालेले शासकीय कर्मचारी, विहित मुदतीत पदोन्नतीच्या पदावर रुजू झाल्यास, त्यांचा आपापसांतील ज्येष्ठतेचा क्रमांक हा, निवडसूचीत त्यांची नावे ज्या क्रमाने दर्शवली आहेत त्याच क्रमानुसार निर्धारित केली जाईल, अशी तरतूद आहे.<br>८. पुणे विभागातील पदोन्नत तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालय पुणे महसूल विभाग पुणे यांनी दिनांक ०३/०८/२०२३ रोजी तहसिलदार | नसून नियमितीकरणांअती तयार करणेत आलेली ज्येष्ठता सूची आहे.<br>८) आपण दाखल केलेल्या दि.११/०८/२०२३ रोजीच्या हरकती/सुचनावर कार्यवाही करुन इकडील दि.०४/०९/२०२३ रोजीच्या ज्ञापनानुसार यादी पुणे विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांचे ई-मेल व राष्ट्रीय सूचना केंद्र यांचेमार्फत प्रसिध्दी करणेत आलेली आहे.<br>९) शासन दि.३१/१०/२०२५ अन्वये प्रसिध्द करणेत आलेल्या ज्येष्ठतासूची वरील हरकती/ सुचनांचे निदान अथवा लेखी उत्तर इकडील कार्यालयास प्राप्त न झालेने तसे कळविणेत आलेले नाही. शासनाकडून तसे प्राप्त झालेनंतर पुणे विभागातील जिल्हाधिकारी व राष्ट्रीय सूचना केंद्र पुणे यांचेमार्फत प्रसिध्द करणेची तजवीज ठेवली आहे. तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचेकडे प्रलंबित OA क्र. ५३८/२०२६ मध्ये अद्याप निर्णय झालेला नाही.<br>i व ii) पदोन्नत नायब तहसिलदार यांचा नियमितीकरण करताना जसे-जसे बिंदु रिक्त होईल त्यानुसार ज्येष्ठतेनुसार येणाऱ्या अधिकारी यांचा विचार करुनच नियमितीकरण केलेले आहे. सरळसेवेने रुजु झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांना सेवेत रुजु झाल्याचा दिनांक अथवा शासनाने निर्धारित केलेला दिनांक हा नियमितीकरणाचा दिनांक नसून फक्त ज्येष्ठतेचा दिनांक दर्शविणेत आलेला आहे.<br>सबब विनंती अमान्य करण्यात येत आहे. |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | संवर्गाची दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीची एकत्रित तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची प्रसिध्द केली होती. मी तहसीलदार संवर्गात दिनांक १३/०५/२०१३ रोजी रुजू झालो असतानाही सदर यादीमध्ये माझे नाव समाविष्ट नसल्यामुळे सदर यादीवर दिनांक ११/०८/२०२३ रोजी हरकती नोंदविण्यात आल्या होत्या. तथापि सदर हरकतीवावत काय निर्णय घेण्यात आला याबाबत मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून कोणतेही लेखी उत्तर प्राप्त झालेले नाही यावावत चौकशी केली असता आमची नावे ज्येष्ठता यादीत नसल्यामुळे आमची विनंती अमान्य करण्यात आल्याचे समजले. ज्येष्ठता यादीत नाव समाविष्ठ नाही या कारणास्तव केलेल्या विनंती हरकत अर्जाला ज्येष्ठता यादीत नाव नसल्याने विनंती अमान्य केलेची वाव अनाकलनीय आहे.<br>९. त्यानंतर तहसिलदार संवर्गाच्या दि. ०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीच्या दि.२९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या राज्यस्तरीय एकत्रित तात्पुरत्या जेष्ठता सूचीचे अवलोकन केले असता सन २००२ ते २००७ च्या M.P.S.C. बॅचचे नायब तहसिलदार हे सन २००१ च्या M.P.S.C. वॅचच्या नायव तहसिलदार यांना तहसिलदार संवर्गात सेवाजेष्ठ दर्शविले असल्याचे दिसून येत असल्यामुळे त्याचप्रमाणे सदरचे नियमितीकरण हे राज्यस्तरावरुन न करता विभाग स्तरावरुन केले असल्याने सेवा जेष्ठता सूची मध्ये जेष्ठता क्रमांकाचे अनियमितता आढळून येत आहे. त्यामुळे नायब तहसिलदार संवर्ग तसेच तहसिलदार संवर्ग हे दोन्ही संवर्ग राज्यस्तरीय संवर्ग असल्याने नायब तहसिलदार तसेच तहसिलदार संवर्गाची सेवा ज्येष्ठता यादी व नियमितीकरण राज्यस्तरावरुन करण्यात यावे. या मुद्याच्या अनुषंगाने दि.२९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या राज्यस्तरीय एकत्रित तात्पुरत्या जेष्ठता सूचीवर देखील दिनांक ११/०१/२०२४ रोजी आपले मार्फत महसूल व वन विभागाकडे आक्षेप नोंदविण्यात आले होते. तथापि सदर आक्षेपांचा विचार न करता दिनांक १३/१०/२०२५ रोजी तहसिलदार संवर्गाची दि. ०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीची अंतिम सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आली. सदर यादी प्रसिद्ध करताना महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकात मुद्दा क्र ६ मध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.<br>"दि.२९.१२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूचीवर ज्या अधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत आक्षेप / निवेदने सादर केलेले आहेत, | |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | त्यांच्या आक्षेपांचे तथायोग्य निराकरण करून संबंधित अधिकाऱ्यास विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत लेखी स्वरूपात कळविण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल."<br>सदर आक्षेपांवावत आज अखेर मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून आम्हांला काहीही कळविण्यात आलेले नाही सदर प्रसिद्ध यादीनुसार उपजिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देखील देण्यात आलेल्या आहेत. त्यात आमच्या नंतर शासन सेवेत रुजू झालेल्या अधिका-यांना देखील उपजिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे. संपूर्ण राज्यामध्ये आमच्या batch मधील व त्यानंतरच्या batch मधील अधिकारी यांना पदोन्नती मिळालेली असतांना केवळ पुणे विभागातील तहसीलदार यांना पदोन्नती मिळालेली नसल्याने पुणे विभागातील तहसीलदारांवर खूपच मोठा अन्याय आलेला आहे. सदर बाबत आम्ही मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचेकडे O.A ५३८/२०२६ अन्वये Petition दाखल केलेली आहे.<br><br>उपरोक्त बाबी वगळता सदर यादीमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत<br>i) पुणे विभागातील पदोन्नत तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने दिनांक २०/०७/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या ज्येष्ठता सूचीमध्ये अनु क्र.४९५ वर माझे नाव ऋषिकेत कांतीलाल शेळके असे चुकीचे नाव नमूद करणेत आले असून त्याठिकाणी ऋषिकेत कांतीलाल शेळके अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच माझा तहसीलदार संवर्गातील प्रथम नियुक्ती दिनांक १३/०५/२०१३ असून ही नियमितीकरणाचा दिनांक ०२/०४/२०१७ असा दर्शविण्यात आला आहे.<br>ii) अनु क्र. ४८९ व ४९० वर अनुक्रमे संगमेश कोडे आणि स्वप्रील रावडे या सरळसेवा तहसीलदार यांचा समावेश केलेला आहे. सदर दोन्ही तहसीलदार हे सदर संवर्गात दिनांक ०२/०५/२०१६ रोजी म्हणजे माझे नंतर रुजू झाले आहेत. त्याचप्रमाणे सदर दोन्ही तहसिलदार यांच्या नावासमोर शेरा कॉलम मध्ये अनुक्रमे अमरावती विभाग आणि नागपूर विभाग असे दर्शविण्यात आले आहे. पुणे विभागातील सेवा ज्येष्ठता यादीत अन्य विभागातील तहसीलदार यांचा समावेश का करण्यात आला आहे याचा बोध होत नाही. | |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| ६ | श्रीमती उज्वला सोरटे, तहसिलदार, पुणे नागरी समूह, पुणे दि.२९/०७/२०२६ (पदोन्नत :- ज्येष्ठता क्रमांक - ४९८ व नियमितीकरणाचा दिनांक :-०२/०७/२०१७) | १) भारतीय राज्य घटनेतील आर्टिकल १४, १५ व १६ नुसार समान न्याय, संधी, भेदभावास प्रतिबंध व सार्वजनिक नोकरीत समान संधी मिळणे आवश्यक असल्याने माझी त्यानुसार सदर नियमितीकरण जेष्ठता यादीस हरकत आहे. सदर नियमितीकरण जेष्ठता यादी करताना प्रथम नियुक्ती दिनांक आधारभूत मानने आवश्यक आहे. त्यानुसार राज्यस्तरावर सेवा ज्येष्ठता यादी अंतिम झाल्यानंतर त्यानुसारच नियमितीकरण सेवा जेष्ठता यादी होणे आवश्यक आहे. परंतू सदर नियमितीकरण ज्येष्ठता यादी करताना या बाबींचा विचार झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरची यादी रद्द करणे आवश्यक आहे. (सोबत सहपत्रे जोडली असे)<br>२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई दि.२१/०६/१९८२ रोजीची नियमावली व महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१/०६/१९८२ अन्वये सेवाजेष्ठता यादी तयार केलेचे दिसून येत नाही. सदरची नियमितीकरणाची सेवा ज्येष्ठता यादी तयार करताना मला तहसिलदार संवर्गात या पदावर दि.१३/०५/२०१३ रोजी नियुक्ती दिली असताना, प्रथमतः राज्य स्तरावरील सेवा ज्येष्ठता यादीनुसार माझे नांव सदर नियुक्ती दिनांकास नियमितीकरण ज्येष्ठता यादी असणे आवश्यक आहे. तथापी दि.२१/०६/१९८२ रोजीच्या वा दि.०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्य शासकीय अधिकारी यांना पदोन्नतीने देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबत निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार विभागीय नियमितीकरण ज्येष्ठता यादी तयार केलेली नाही. त्यामुळे सदरची यादी रद्द करण्यात यावी,<br>३) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई दि. २१/०६/१९८२ रोजीच्या नियमावलीत मुद्दा क्र.५ (६) मध्ये निवडसूची तयार करताना शासकीय अधिकाऱ्यास डावलण्यात आले असेल तर सक्षम प्राधिकारी यानी स्वतः होऊन रद्द ठरवली तर, अशा अधिकाऱ्याची प्रत्यक्ष पदोन्नती झाल्यावर त्याला याप्रमाणे नेमणूकीची मानीव तारीख म्हणून नेमून देण्यात येईल, अशी तरतूद आहे. तसेच मुद्दा क्र.७ मध्ये शासकीय अधिकाऱ्यास एखादया वर्गास गैरवाजवी तोशीस सोसावी लागत असेल वा संभवना असेल, तर ती कारणे नमूद करुन लोकहिताच्या दृष्टीने नियम शिथील करुन फेरबदल करण्याची अधिकार दिले आहे. याबाबींचा विचार विभागीय स्तरावरील नियमितीकरण ज्येष्ठता यादी तयार करताना केल्याचे दिसून येत नाही. | १) सेवाज्येष्ठता व पदोन्नत नायब तहसिलदार संवर्गातील अधिकारी यांचे नियिमतीकरणा अंती होणारी ज्येष्ठता ह्या दोन स्वंतत्र बाबी आहेत. नियमितीकरण करताना सर्व निकषांचा विचार करुनच यादी तयार करुन प्रसिध्द करणेत आलेली आहे.<br>२, ३ व ४) वरीलप्रमाणे<br>५ व ६) सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>७) पदोन्नत नायब तहसिलदार संवर्गातील अधिकारी यांचे तहसिलदार संवार्गत पदोन्नतीचे अनुषंगाने नियमितीकरण करताना शासनाचे त्या-त्या वेळी लागू असलेल्या प्रत्येक शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊनच कार्यवाही करणेत आलेली आहे.<br>८ ते १०)सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>११) सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>पदोन्नत नायब तहसिलदार यांचा नियमितीकरण करताना जसे-जसे बिंदु रिक्त होईल त्यानुसार ज्येष्ठतेनुसार येणाऱ्या अधिकारी यांचा विचार करुनच नियमितीकरण केलेले आहे. सरळसेवेने रुजु झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांना सेवेत रुजु झाल्याचा दिनांक अथवा शासनाने निर्धारित केलेला दिनांक हा नियमितीकरणाचा दिनांक नसून फक्त ज्येष्ठतेचा दिनांक दर्शविणेत आलेला आहे.<br>सबब विनंती अमान्य करण्यात येत आहे. |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | ४) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई दि.२१/०६/१९८२ रोजीची नियमावली व महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१/०६/१९८२ अन्वये नियमितीकरण जेष्ठता यादी तयार केलेचे दिसून येत नाही.<br>५) तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग असल्याने तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरण हे नियमानुसार राज्यस्तरावरुन होणे अपेक्षित आहे.<br>६) सेवा जेष्ठता यादी नियमितीकरणाच्या दिनांकावर न करता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या निवडसूचीच्या गुणानुक्रमानुसार करण्यात यावी हे नैसर्गिक न्यायतत्वानुसार योग्य होईल.<br>७) तसेच महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.०५/११/२००९ रोजीच्या परिपत्रकात अनुसूचित जाती कल्याण समिती व विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समितीने बिंदूनामावली व आरक्षणाची पद भरण्याबाबत केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीनुसार राज्यातील वर्ग १ व वर्ग अधिकाऱ्यांच्या बिंदुनामावल्या मंत्रालयातील मागासवर्ग कक्षाने तपासून प्रमाणित करणे अभिप्रेत असल्याने निश्चित केले असताना, देखिल दि.०५/११/२००९ रोजीच्या परिपत्रकातील तरतूदीनुसार विभागीय स्तरावरील नियमितीकरण ज्येष्ठता यादी तयार करण्यात याचा विचार झाल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे सदरची यादी रद्द करावी.<br>८) तसेच सदरची तहसिलदार संवर्गाची नियमितीकरण ज्येष्ठता यादी तयार करताना महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.२०/०७/२०२६ नुसार सदर संवर्गाकरीता नियुक्ती प्राधिकारी हे मुख्यमंत्री असल्याने नियुक्ती प्राधिकारी स्तरावर म्हणजेच राज्यस्तरावर तहसिलदार संवर्गाची नियमितीकरण ज्येष्ठता यादी तयार करता सेवा जेष्ठतेचा दिनांक आधारभूत मानून विभागीय स्तरावरील नियमितीकरण ज्येष्ठता यादी तयार करणे अभिप्रेत आहे.<br>९) महाराष्ट्र शासन, महसूल विभाग, यांचेकडील क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र. १२०/आस्था-०१ (ई-१७०६४१४), दि.२८/०७/२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्रं.७ मध्ये दि.२०/०७/२०२६ येथील अधिसूचनेन्वये प्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार तहसिलदार व नायब तहसिलदार हे दोन्ही संवर्ग आता राज्य स्तरीय संवर्ग राहतील. तहसिलदार संवर्गाच्या सेवाज्येष्ठता याद्या राज्यस्तरावर ठेवण्यात येतील तसेच बिंदुनामावली, सरळसेवा भरतीची मागणीपत्रे, बदल्या, पदोन्नती इ. प्रक्रिया राज्यस्तरावरुन राबविण्यात येईल. असे स्पष्ट नमूद असल्याने विभागीय स्तरावर तयार करण्यात आलेली | |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक</th><th>हरकतीचे स्वरुप</th><th>अभिप्राय</th></tr>
<tr><td></td><td></td><td>
नियमितीकरण ज्येष्ठता यादी ही चुकीची झाली असल्याने रद्द करण्यात यावी.<br>
१०) राज्यस्तरावरील ज्येष्ठता यादी ही तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्याची पदोन्नतीकरता सेवा ज्येष्ठता ही नियुक्ती दिनांकावर आधारीत आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:एसआरव्ही-२०१८ /प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१/०८२०१९ नुसार राज्य शासकीय अधिकारी यांना पदोन्नती देण्याकरिता अनुसरावयाची कार्यवाहीबाबत निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार समानता येत नाही. त्यामुळे सदरची यादी रद्द होण्यास पात्र आहे.<br>
११) तसेच महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील क्र. सेवाज्ये-२०२२/प्र.क्र.१२७/ई-९, दि.१७/०८/२०२२ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये नायब तहसिलदार या संवर्गाची दि.०१/०१/२०१५ ची एकत्रित अंतिम सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरची राज्यस्तरीय अंतिम सेवाजेष्ठता यादी आधारभूत मानून राज्यस्तरीय नियमितीकरण ज्येष्ठता यादी तयार होणे आवश्यक आहे. तथापी, सदरची यादी ही त्यानुसार झाल्याचे दिसून येत नाही.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तहसिलदाराचे नांव</th><th>प्रत्यक्ष जात व जातीचा प्रवर्ग</th><th>तहसिलदार संवर्गात प्रथम नियुक्तीचा दिनांक</th></tr>
<tr><td>१</td><td>श्री संगमेश कोडे</td><td>खुला</td><td>०२/०५/२०१६</td></tr>
<tr><td>२</td><td>श्री स्वप्नील रावडे</td><td>खुला</td><td>०२/०५/२०१६</td></tr>
<tr><td>३</td><td>श्रीमती सुनिता नेर्लीकर</td><td>अनुसूचित जाती</td><td>०५/०६/२०१३</td></tr>
<tr><td>४</td><td>श्री विकास भालेराव</td><td>अनुसूचित जाती</td><td>१२/०८/२०१३</td></tr>
</table>
अ.क्र.४८९ ते अ.क्र.४९२ वरील यांची सेवाज्येष्ठता माझ्यानंतरची असताना देखिल केवळ विभागीय स्तरावरील बिंदुनामावलीतील बिंदू व नियमितीकरण ज्येष्ठता यादीतील नियमितीकरण दिनांकामुळे ते सेवाज्येष्ठतेनुसार ते मला नियमितीकरण ज्येष्ठता यादीत वरील अनुक्रमांकावर समाविष्ठ केले आहेत ते पुर्णपणे चुकीचे आहे. सदरची नियमितीकरण ज्येष्ठता यादी तयार करताना राज्यस्तरीय सेवाज्येष्ठता यादीनुसार तयार केलेली नसल्याने नैसर्गिक न्यायाच्या समान संधी न मिळाल्याने माझ्यावर पुढील पदोन्नतीमध्ये अन्याय होणार आहे. तरी माझ्या आक्षेपांची नोंद घेवून मला तहसिलदार संवर्गाच्या राज्यस्तरीय ज्येष्ठता यादीमध्ये माझ्या नियुक्ती दिनांकास समाविष्ट करुन सेवाजेष्ठता हो नियमितीकरण
</td><td></td></tr>
</table>

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | ज्येष्ठता यादीमध्ये योग्य ठिकाणी समाविष्ट करुन देणेबाबत आपले मार्फत मा.मुख्य सचिव महसूल व वन विभाग महाराष्ट्र राज्य यांचेकडे शिफारस करणेस विनंती आहे. | |
| ७ | श्रीमती रुपाली संदीप सरनोबत, तहसिलदार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई, दि.२८/०७/२०२६ (पदोन्नत :- ज्येष्ठता क्रमांक - ५०१ व नियमितीकरणाचा दिनांक :-०६/०७/२०१८) | १. दिनांक २०/७/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेली तहसीलदार संवर्गाची ज्येष्ठता सूची तयार करताना नियमितीकरण करण्याकरिता देण्यात आलेल्या तारखा चुकीच्या आणि अन्यायकारक आहेत. कारण तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग (Cadre) असल्याने विभागस्तरावर देण्यात आलेला ज्येष्ठता क्रमांक हा ज्या निकषांच्या आधारे देण्यात आलेला आहे ते निकष त्या त्या वर्षी पदोन्नती करता पात्र असलेल्या सर्व महसूली विभागातील, सर्व अधिकाऱ्यांना (सर्व जात प्रवर्गासह) समानतेने लागू होणे आवश्यक आहे.<br>२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २००१ च्या गुणानुक्रम यादीनुसार राज्याची एकत्रित यादी तयार करुन आयोगाकडे निवड झालेला जातीचा प्रवर्ग व प्रत्यक्ष व्यक्ति ज्या जातीच्या प्रवर्गात मोडते त्या प्रवर्गाचा शिल्लक बिंदू, Joining Date या निकषांचा प्राधान्याने विचार करुन त्यानंतर नियमितीकरणाबाबत शासन अधिनियमानुसार पदोन्नतीची राज्यस्तरावर अंतिम यादी तयार करुन त्यामध्ये सरळ सेवा व पदोन्नतीच्या शिल्लक कोटा प्रमाणे एकत्रित राज्यस्तरीय अंतिम सेवा ज्येष्ठता सूची तयार करणे आवश्यक व नियमानुसार योग्य आहे. तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग असल्याने तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरण हे नियमानुसार राज्यस्तरावरुन होणे अपेक्षित आहे.<br>३. नायब तहसिलदार तसेच तहसिलदार संवर्गातील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य स्तरावरून भरली जात असल्याने तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरण हे नियमानुसार विभागीय स्तरावरून न होता राज्यस्तरावरुन होणे आवश्यक असताना आणि सदर यादी नायब तहसीलदार संवर्गाच्या राज्यस्तरीय अंतिम सेवा ज्येष्ठता यादीला अनुसरून करणे आवश्यक असताना देखील पुन्हा विभागीय स्तरावरच नियमितीकरण करून प्रसिद्ध करण्यात आली आहे<br>४. Tahsildar Recruitment Rule १९८९ मध्ये तहसीलदार संवर्ग हा विभागीय संवर्ग असेल असे नमूद केलेले असले तरी तहसीलदार संवर्गाची सेवा जेष्टता यादी विभाग स्तरावर ठेवण्यात यावी याबाबत उल्लेख केलेला नाही. ज्या संवर्गाच्या बाबतीत सेवा जेष्टता यादीबाबत RRमध्ये स्पष्टता नसेल त्या संवर्गासाठी Maharashtra Civil Services (Regulation of Seniority) Rules, १९८२ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१/०६/२०२१ | १) सन १९९७-९८ ते २०२१-२२ पर्यंत नियमितीकरण करताना वेळोवेळी असलेल्या प्रचलित नियम व निकषानुसार विभागस्तरावरुन तयार करणेत आलेले आहे. त्यानुसार सन १९९७-९८ ते २०१५-१६ (दि.३१/१२/२०१५ अखेर) व सन २०१६-१७ ते २०२१-२२ (दि.३१/१२/२०२१ अखेर) यानुसार दोन टप्प्यानुसार सदर यादी प्रसिध्द करणेत आलेली आहे.<br>२) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील राजपत्र दि.२७/०४/१९८९ नुसार तहसिलदारांचे सेवाप्रवेश नियम १९८९ प्रसिध्द करणेत आलेले आहे. त्यानुसार तहसिलदारांचा संवर्ग विभागीय संवर्ग असेल आणि त्या संवर्गात नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांची संबंधित विभागाच्या कोणत्याही भागात पदस्थापना, बदली किंवा प्रतिनियुक्ती होऊ शकेल, असे नमूद केले आहे. तसेच शासन निर्णय दि.१०/०५/२०२१ अन्वये तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग म्हणून घोषित करणेत आलेला आहे. यास्तव शासनाने वेळोवेळी बैठक आयोजित करुन सदर बैठकीत दिलेल्या मार्गदर्शनानुसार उक्त कालावधीतील नियमितीकरण हे विभागस्तरावरुन करणेत आलेले असून त्यास शासनाकडील दि.२९/१२/२०२३ अन्वये मंजूरी मिळालेली आहे<br>३) सदर बाब शासन स्तरावरील आहे. |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | (महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली लागू करणेबाबत निर्देश आहेत.<br>५. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई दि.२१/०६/१९८२ रोजीची नियमावली, महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१/०६/२०२१ (महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली) अन्वये सेवाजेष्ठता यादी तयार केलेचे दिसून येत नाही.<br>६. Maharashtra Civil Services (Regulation of Seniority) Rules, १९८२ कलम ४(२) नुसार पोट नियम १ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील नेमणुकीसाठी एकाच तुकडीत निवड होवून थेट भरती झालेल्या व्यक्तींनी नेमणूक आदेश निघाल्याच्या तारखेपासून तीन दिवसाच्या आत किंवा सक्षम प्राधिकारी स्वविवेकानुसार वाढवून देईल अशा कालावधीत जर नेमणुकीचा स्वीकार केला असेल तर त्यांच्या आपसातील ज्येष्ठता, आयोगाने व निवड मंडळाने किंवा प्रकरण परत्वे सक्षम प्राधिकाऱ्याकडून नामनिर्देशनाद्वारे झालेल्या थेट भरतीच्या बाबतीत सदर सक्षम प्राधिकाऱ्याने लावलेल्या पसंतीक्रमानुसार निर्धारित केली जाईल (ब) निवड सूचीतून पदोन्नती मिळालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अशा निवडसूचीत त्यांची नावे ज्या क्रमाने असतील त्याच क्रमानुसार त्यांची आपसातील ज्येष्ठता राहील, जर निवडसूची दोन भागात तयार केलेली असेल तर, पहिल्या भागात बिनशर्त निवड झालेल्यांची नावे अंतर्भूत असतील व दुसऱ्या भागात निवड झालेल्यांची नावे असतील. पहिल्या भागात समाविष्ट झालेल्या सर्व व्यकर्तींचा क्रम दुसऱ्या भागातील समाविष्ट केलेल्या व्यक्तींच्या वर लागेल. परंतु निवडसूचीतील नावे ज्या क्रमाने लावलेली आहेत तो क्रम मागाहून आढावा घेतल्यामुळे बदलण्यात आला तर, संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचा ज्येष्ठताक्रम त्यांच्या या सुधारित क्रमानुसार फेरमांडणी करण्यात येऊन निर्धारित केला जाईल.<br>७. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ मधील कलम ४ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक निर्धारित करणे:- पोट नियम (२) [ii] पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा ज्येष्ठता क्रमांक-मध्ये अशी तरतूद केली आहे की, खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नियमित निवडसूचीतून पदोन्नती मिळालेले शासकीय कर्मचारी, विहित मुदतीत पदोन्नतीच्या पदावर रुजू झाल्यास, त्यांचा आपापसांतील ज्येष्ठतेचा क्रमांक हा, निवडसूचीत त्यांची नावे ज्या क्रमाने दर्शवली आहेत त्याच क्रमानुसार निर्धारित केली जाईल, अशी तरतूद आहे. | ४) सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>५, ६ व ७) सदर यादी फक्त सेवाज्येष्ठता यादी नसून नियमितीकरणांअती तयार करणेत आलेली ज्येष्ठता सूची आहे.<br>८) आपण दाखल केलेल्या दि.११/०८/२०२३ रोजीच्या हरकती/सुचनावर कार्यवाही करुन इकडील दि.०४/०९/२०२३ रोजीच्या ज्ञापनानुसार यादी पुणे विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांचे ई-मेल व राष्ट्रीय सूचना केंद्र यांचेमार्फत प्रसिध्दी करणेत आलेली आहे.<br>९) शासन दि.३१/१०/२०२५ अन्वये प्रसिध्द करणेत आलेल्या ज्येष्ठतासूची वरील हरकती/ सुचनांचे निदान अथवा लेखी उत्तर इकडील कार्यालयास प्राप्त न झालेने तसे कळविणेत आलेले नाही. शासनाकडून तसे प्राप्त झालेनंतर पुणे विभागातील जिल्हाधिकारी व राष्ट्रीय सूचना केंद्र पुणे यांचेमार्फत प्रसिध्द करणेची तजवीज ठेवली आहे.<br>१० व ११) पदोन्नत नायब तहसिलदार यांचा नियमितीकरण करताना जसे-जसे बिंदु रिक्त होईल त्यानुसार ज्येष्ठतेनुसार येणाऱ्या अधिकारी यांचा विचार करुनच नियमितीकरण केलेले आहे. सरळसेवेने रुजु झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांना सेवेत रुजु झाल्याचा दिनांक अथवा शासनाने निर्धारित केलेला दिनांक हा नियमितीकरणाचा दिनांक नसून फक्त ज्येष्ठतेचा दिनांक दर्शविणेत आलेला आहे.<br>सबब विनंती अमान्य करण्यात येत आहे. |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | ८. पुणे विभागातील पदोन्नत तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालय पुणे महसूल विभाग पुणे यांनी दिनांक ३/८/२०२३ रोजी तहसिलदार संवर्गाची दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीची एकत्रित तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची प्रसिध्द केली होती. मी तहसीलदार संवर्गात सन २०१४ साली रुजू झाले असतानाही सदर यादीमध्ये आमची नावे समाविष्ट नसल्यामुळे सदर यादीवर दिनांक ११/८/२०२३ रोजी हरकती नोंदविण्यात आल्या होत्या. तथापि सदर हरकतीबाबत काय निर्णय घेण्यात आला याबाबत मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून कोणतेही लेखी उत्तर प्राप्त झालेले नाही याबाबत चौकशी केली असता आमची नावे ज्येष्ठता यादीत नसल्यामुळे आमची विनंती अमान्य करण्यात आल्याचे समजले. ज्येष्ठता यादीत नाव समाविष्ठ नाही या कारणास्तव केलेल्या विनंती हरकत अर्जाला ज्येष्ठता यादीत नाव नसल्याने विनंती अमान्य केलेची बाब अनाकलनीय आहे.<br>९. त्यानंतर तहसिलदार संवर्गाच्या दि. ०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीच्या दि.२९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या राज्यस्तरीय एकत्रित तात्पुरत्या जेष्ठता सूचीचे अवलोकन केले असता सन २००२ ते २००७ च्या M.P.S.C. बॅचचे नायब तहसिलदार हे सन २००१ च्या M.P.S.C. बॅचच्या नायब तहसिलदार यांना तहसिलदार संवर्गात सेवाजेष्ठ दर्शविले असल्याचे दिसून येत असल्यामुळे त्याचप्रमाणे सदरचे नियमितीकरण हे राज्यस्तरावरुन न करता विभाग स्तरावरुन केले असल्याने सेवा जेष्ठता सूची मध्ये जेष्ठता क्रमांकाचे अनियमितता आढळून येत आहे. त्यामुळे नायब तहसिलदार संवर्ग तसेच तहसिलदार संवर्ग हे दोन्ही संवर्ग राज्यस्तरीय संवर्ग असल्याने नायब तहसिलदार तसेच तहसिलदार संवर्गाची सेवा ज्येष्ठता यादी व नियमितीकरण राज्यस्तरावरुन करण्यात यावे. या मुद्द्याच्या अनुषंगाने दि.२९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या राज्यस्तरीय एकत्रित तात्पुरत्या जेष्ठता सूचीवर देखील दिनांक ११/१/२०२४ रोजी आपले मार्फत महसूल व वन विभागाकडे आक्षेप नोंदविण्यात आले होते. तथापि सदर आक्षेपांचा विचार न करता दिनांक १३/१०/२०२५ रोजी तहसिलदार संवर्गाची दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीची अंतिम सेवा ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आली. सदर यादी प्रसिद्ध करताना महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकात मुद्दा क्र ६ मध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे. | |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | "दि. २९.१२.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूचीवर ज्या अधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत आक्षेप / निवेदने सादर केलेले आहेत, त्यांच्या आक्षेपांचे तथायोग्य निराकरण करुन संबंधित अधिकाऱ्यास विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत लेखी स्वरुपात कळविण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल."<br>सदर आक्षेपांबाबत आज अखेर मा. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून आम्हांला काहीही कळविण्यात आलेले नाही सदर प्रसिद्ध यादीनुसार उपजिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देखील देण्यात आलेल्या आहेत. त्यात आमच्या नंतर शासन सेवेत रुजू झालेल्या अधिकाऱ्याना देखील उपजिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे. संपूर्ण राज्यामध्ये आमच्या batch मधील व त्यानंतरच्या batch मधील अधिकारी यांना पदोन्नती मिळालेली असतांना केवळ पुणे विभागातील तहसीलदार यांना पदोन्नती मिळालेली नसल्याने पुणे विभागातील तहसीलदारांवर खूपच मोठा अन्याय झालेला आहे.<br>सदर बाबत आम्ही मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचेकडे Petition दाखल केलेली आहे.<br>उपरोक्त बाबी वगळता सदर यादीमध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत<br>१०. पुणे विभागातील पदोन्नत तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने दिनांक २०/७/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या ज्येष्ठता सूचीमध्ये माझे नाव अनु क्र ५०१ वर नमूद आहे माझा तहसीलदार संवर्गातील प्रथम नियुक्ती दिनांक १०/०५/२०१३ असूनही नियमितीकरणाचा दिनांक ०६/०७/२०१८ दर्शविण्यात आला आहे.<br>११. अनु क्र ४८९ व ४९० वर अनुक्रमे संगमेश कोडे आणि स्वप्नील रावडे या सरळसेवा तहसीलदार यांचा समावेश केलेला आहे. सदर दोन्ही तहसीलदार हे सदर संवर्गात दिनांक २/५/२०१६ रोजी म्हणजे माझे नंतर रुजू झाले आहेत. त्याचप्रमाणे सदर दोन्ही तहसिलदार यांच्या नावासमोर शेरा कॉलम मध्ये अनुक्रमे अमरावती विभाग आणि नागपूर विभाग असे दर्शविण्यात आले आहे. अनु क्र ५०० वर अभिजीत जाधव या सरळसेवा तहसीलदार यांचा समावेश केलेला आहे. सदर तहसीलदार हे सदर संवर्गात दिनांक १/८/२०१७ रोजी म्हणजे माझे नंतर रुजू झाले आहेत. सदर तहसिलदार यांच्या नावासमोर शेरा कॉलम मध्ये नाशिक विभाग असे दर्शविण्यात आले आहे. पुणे विभागातील सेवा ज्येष्ठता यादीत अन्य विभागातील तहसीलदार यांचा समावेश का करण्यात आला आहे याचा बोध होत नाही. | |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| ८ | श्रीमती रंजना उबरहंडे (ढोकळे), विशेष कार्यकारी दंडाधिकारी, तथा तहसिलदार, जि.सांगली, दि.२९/०७/२०२६ (पदोन्नत:- ज्येष्ठता क्रमांक - ५०२ व नियमितीकरणाचा दिनांक :-०६/०७/२०१८) | १. माझ्या दिनांक ०१.०२.२०२३, ११.०८.२०२३ व ११.०१.२०२४ रोजीच्या हरकतींचा एकत्रित विचार करून कारणयुक्त आदेश पारित करण्यात यावा.<br><br>२. माझी सेवाज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (Regulation of Seniority) Rules, १९८२, लागू सेवा नियम व शासनाच्या संबंधित आदेशांच्या आधारे पुनर्निश्चित करण्यात यावी.<br>३. राज्यस्तरीय नियमितीकरणाच्या आधारे येणारी दिनांक सेवाज्येष्ठतेसाठी ग्राह्य धरण्यात यावी.<br>४. दिनांक १३.१०.२०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या अंतिम राज्यस्तरीय तहसीलदार संवर्गाच्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये माझे नाव समाविष्ट न करण्याचा निर्णय पुनर्विचारार्थ घेण्यात यावा. व माझी ज्येष्ठता योग्य त्या अनुक्रमांकवर दर्शविण्यात यावी. | १) प्राप्त हरकतींवर उचित कार्यवाही करुन अभिप्राय पुणे विभागातील सर्व जिल्हाधिकारी तसेच राष्ट्रीय सुचना केंद्र पुणे यांचे मार्फत प्रसिध्द करणेत आलेले आहे. तसेच शासन स्तरावरील हरकतींवर या कार्यालयाचे अभिप्राय इकडील पत्र दि.०६/०२/२०२४ अन्वये शासनास सादर करणेत आलेले आहे. त्यानुसार शासनाकडील उत्तर/अभिप्राय इकडील कार्यालयास प्राप्त नसलेने उपलब्ध करुन देता आलेले नाही.<br>२ ते ४) सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>सबब विनंती अमान्य करण्यात येत आहे. |
| ९ | श्रीमती स्मिता पवार, तहसिलदार (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय पुणे, दि.२८/०७/२०२६ (पदोन्नत:- ज्येष्ठता क्रमांक - ५०३ व नियमितीकरणाचा दिनांक :-०६/०७/२०१८) | १. दिनांक २०/७/२०२६ रोजी प्रसिद्ध केलेली तहसीलदार संवर्गाची ज्येष्ठता सूची तयार करताना नियमितीकरण करण्याकरिता देण्यात आलेल्या तारखा चुकीच्या आणि अन्यायकारक आहेत. कारण तहसीलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग (Cadre) असल्याने विभागस्तरावर देण्यात आलेला ज्येष्ठता क्रमांक हा ज्या निकषांच्या आधारे देण्यात आलेला आहे ते निकष त्या त्या वर्षी पदोन्नती करता पात्र असलेल्या सर्व महसूली विभागातील, सर्व अधिकाऱ्यांना (सर्व जात प्रवर्गासह) समानतेने लागू होणे आवश्यक आहे.<br>२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २००१ च्या गुणानुक्रम यादीनुसार राज्याची एकत्रित यादी तयार करुन आयोगाकडे निवड झालेला जातीचा प्रवर्ग व प्रत्यक्ष व्यक्ती ज्या जातीच्या प्रवर्गात मोडते त्या प्रवर्गाचा शिल्लक बिंदू, Joining Date या निकषांचा प्राधान्याने विचार करुन त्यानंतर नियमितीकरणाबाबत शासन अधिनियमानुसार पदोन्नतीची राज्यस्तरावर अंतिम यादी तयार करुन त्यामध्ये सरळ सेवा व पदोन्नतीच्या शिल्लक कोटा प्रमाणे एकत्रित राज्यस्तरीय अंतिम सेवा ज्येष्ठता सूची तयार करणे आवश्यक व नियमानुसार योग्य आहे. तहसीलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग असल्याने तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरण हे नियमानुसार राज्यस्तरावरुन होणे अपेक्षित आहे.<br>३. नायब तहसीलदार तसेच तहसीलदार संवर्गातील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य स्तरावरून भरली जात असल्याने तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरण हे नियमानुसार | १) सन १९९७-९८ ते २०२१-२२ पर्यंत नियमितीकरण करताना वेळोवेळी असलेल्या प्रचलित नियम व निकषानुसार विभागस्तरावरुन तयार करणेत आलेले आहे. त्यानुसार सन १९९७-९८ ते २०१५-१६ (दि.३१/१२/२०१५ अखेर) व सन २०१६-१७ ते २०२१-२२ (दि.३१/१२/२०२१ अखेर) यानुसार दोन टप्प्यानुसार सदर यादी प्रसिध्द करणेत आलेली आहे.<br>२) शासन, महसूल व वन विभाग यांजकडील राजपत्र दि.२७/०४/१९८९ नुसार तहसिलदारांचे सेवाप्रवेश नियम १९८९ प्रसिध्द करणेत आलेले आहे. त्यानुसार तहसिलदारांचा संवर्ग विभागीय संवर्ग असेल आणि त्या संवर्गात नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांची संबंधित विभागाच्या कोणत्याही भागात पदस्थापना, बदली किंवा प्रतिनियुक्ती होऊ शकेल, असे नमूद केले आहे. तसेच शासन निर्णय दि.१०/०५/२०२१ अन्वये |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | विभागीय स्तरावरून न होता राज्यस्तरावरुन होणे आवश्यक असताना आणि सदर यादी नायब तहसीलदार संवर्गाच्या राज्यस्तरीय अंतिम सेवा ज्येष्ठता यादीला अनुसरून करणे आवश्यक असताना देखील पुन्हा विभागीय स्तरावरच नियमितीकरण करून प्रसिद्ध करण्यात आली आहे.<br>४. पुणे विभागातील पदोन्नत तहसीलदार संवर्गाचे नियमितीकरणाचे अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे महसूल विभाग, पुणे यांनी दिनांक ३/८/२०२३ रोजी तहसीलदार संवर्गाची दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीची एकत्रित तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची प्रसिध्द केली होती. मी तहसीलदार संवर्गात सन २०१३ साली रुजू झालो असतानाही सदर यादीमध्ये माझे नाव चुकीच्या ठिकाणी समाविष्ट केलेले असल्यामुळे सदर यादीवर दिनांक ०७/०९/२०२३ रोजी हरकत नोंदविण्यात आली होती.<br>५. त्यानंतर तहसीलदार संवर्गाच्या दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीच्या दि.२९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या राज्यस्तरीय एकत्रित तात्पुरत्या जेष्ठता सूचीचे अवलोकन केले असता सन २००२ ते २००७ च्या M.P.S.C. बॅचचे नायब तहसीलदार हे सन २००१ च्या M.P.S.C. बॅचच्या नायब तहसीलदार यांना तहसीलदार संवर्गात सेवाजेष्ठ दर्शविले असल्याचे दिसून येत असल्यामुळे त्याचप्रमाणे सदरचे नियमितीकरण हे राज्यस्तरावरुन न करता विभाग स्तरावरुन केले असल्याने सेवा जेष्ठता सूची मध्ये जेष्ठता क्रमांकाचे अनियमितता आढळून येत आहे. त्यामुळे नायब तहसीलदार संवर्ग तसेच तहसीलदार संवर्ग हे दोन्ही संवर्ग राज्यस्तरीय संवर्ग असल्याने नायब तहसीलदार तसेच तहसीलदार संवर्गाची सेवा ज्येष्ठता यादी व नियमितीकरण राज्यस्तरावरुन करण्यात यावे. या मुद्याच्या अनुषंगाने दि.२९/१२/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या राज्यस्तरीय एकत्रित तात्पुरत्या जेष्ठता सूचीवर देखील दिनांक ११/१/२०२४ रोजी आपले मार्फत महसूल व वन विभागाकडे आक्षेप नोंदविण्यात आले होते. मी घेतलेली हरकत ही मा. विभागीय आयुक्त पुणे व मा. महाराष्ट्र शासन महसूल विभाग यांनी मान्य केलेली असुन त्यानुसार मला तहसीलदार संवर्गाची दि.०१/०१/१९९७ ते ३१/१२/२०१५ या कालावधीची राज्यस्तरावरील एकत्रित अंतिम सेवाज्येष्ठता सूची दि.१३/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करणेत आली. सदर यादी प्रसिद्ध करताना महसूल व वन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकात मुद्दा क्र. ६ मध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे. | तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग म्हणून घोषित करणेत आलेला आहे. यास्तव शासनाने वेळोवेळी बैठक आयोजित करुन सदर बैठकीत दिलेल्या मार्गदर्शनानुसार उक्त कालावधीतील नियमितीकरण हे विभागस्तरावरुन करणेत आलेले असून त्यास शासनाकडील दि.२९/१२/२०२३ अन्वये मंजूरी मिळालेली आहे<br>३) सदर बाब शासन स्तरावरील आहे.<br>४) आपण दाखल केलेल्या दि.११/०८/२०२३ रोजीच्या हरकती/सुचनावर कार्यवाही करुन इकडील दि.०४/०९/२०२३ रोजीच्या ज्ञापनानुसार यादी पुणे विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांचे ई-मेल व राष्ट्रीय सूचना केंद्र यांचेमार्फत प्रसिध्दी करणेत आलेली आहे.<br>५) सदर यादी फक्त सेवाज्येष्ठता यादी नसून नियमितीकरणांअती तयार करणेत आलेली ज्येष्ठता सूची आहे. शासन दि.३१/१०/२०२५ अन्वये प्रसिध्द करणेत आलेल्या ज्येष्ठतासूची वरील हरकती/ सुचनांचे निदान अथवा लेखी उत्तर इकडील कार्यालयास प्राप्त न झालेने तसे कळविणेत आलेले नाही. शासनाकडून तसे प्राप्त झालेनंतर पुणे विभागातील जिल्हाधिकारी व राष्ट्रीय सूचना केंद्र पुणे यांचेमार्फत प्रसिध्द करणेची तजवीज ठेवली आहे.<br>६ व ७) पदोन्नत तहसिलदार संवर्गाचे नियमितीकरणाचा ७५% ते ६७% (आवश्यकतेप्रमाणे प्रवाही) याप्रमाणे प्रस्ताव इकडील पत्र दि.११/०३/२०२६ अन्वये शासनास |

| अ. क्र. | अधिकारी यांचे नाव, पदनाम, ज्येष्ठता क्रमांक | हरकतीचे स्वरुप | अभिप्राय |
|---|---|---|---|
